
मिलिंद कुलकर्णी
काटा किर्र

# काटा किर्र

मिलींद सीताराम कुलकर्णी

ई साहित्य प्रतिष्ठान

काटा किर्र (भयकथासंग्रह)

लेखक : मिलींद सीताराम कुलकर्णी
House No. A-14, Shri Vasunhara Gurubaksh Green colony,
Opp. Jaycees Public School, Near Shri Krishna Hospital,
Gangapur Road, Rudrapur
Distt. Udham Singh Nagar. Uttarakhand.
Phone no. 08171030307,
Email: milindslkulkarni@rediffmail. com

या पुस्तकातील लेखनाचे सर्व हक्क लेखकाकडे सुरक्षित असून पुस्तकाचे किंवा त्यातील अंशाचे पुनर्मुद्रण वा नाट्य, चित्रपट किंवा इतर रुपांतर करण्यासाठी लेखकाची परवानगी घेणे आवश्यक आहे. तसे न केल्यास कायदेशीर कारवाई होऊ शकते.

प्रकाशक : ई साहित्य प्रतिष्ठान

www. esahity. com

esahity@gmail. com

9869674820

प्रकाशन :५ सप्टेंबर २०१६ (गणेशचतुर्थी)


©esahity Pratishthan®2016

- विनामूल्य वितरणासाठी उपलब्ध.

- आपले वाचून झाल्यावर आपण हे फ़ॉरवर्ड करू शकता.

- हे ई पुस्तक वेबसाईटवर ठेवण्यापुर्वी किंवा वाचनाव्यतिरिक्त कोणताही वापर करण्यापुर्वी ईसाहित्य प्रतिष्ठानची परवानगी - घेणे आवश्यकआहे.

मी मिलिंद सीताराम कुलकर्णी



जन्म तारीख : 25 मार्च 1972. शिक्षण: मेकॅनिकल इंजिनिअर. मूळ रहिवासी : कोल्हापूर. प्राथमिक/माध्यमिक शिक्षण : मराठी माध्यम. मातृभाषा: कन्नड (आई: विजापूर- कर्नाटक).

सध्या पुण्यात हेड-ऑफिस असणाऱ्या एका इंजिनीरिंग मॅनुफॅक्चरिंग कंपनीच्या पंत-नगर (रुद्रपूर) उत्तराखंड येथे असणाऱ्या शाखेमध्ये शाखा प्रमुख. त्यापूर्वी, जयसिंगपूर, कोल्हापूर, बेळगाव, पुणे येथे नोकरीच्या निमित्ताने वास्तव्य.

“पुण्यातल्या एका इंजिनीरिंग कंपनीच्या पंत-नगर (रुद्रपूर) शाखेत शाखाप्रमुख म्हणून गेल्या पाच वर्षांपासून काम पाहतोय. मूळ कोल्हापूरचा. मातृभाषा कन्नड पण वडील महाराष्ट्र शासनामध्ये नोकरी करत असल्यामुळे शिक्षण मराठीत झाले. लहानपणापासून वाचनाची बऱ्यापैकी आवड होती. त्यातच लिखाणाची सवय लागली. वयाच्या विसाव्या वर्षांपासून लिहिण्यास सुरुवात केली होती. जयसिंगपूर, कोल्हापूर, पुणे, बेळगाव आणि आता रुद्रपूर इथे वेग-वेगळया कंपनीमध्ये नोकरी करता-करता, कामाच्या व्यापामुळे मध्यंतरी पंधरा-वीस वर्षे मनात असून सुद्धा लिहिणे शक्य झाले नाही. दोन-तीन वर्षांपूर्वी पूर्वी मीच लिहिलेल्या काही कथा वाचल्यानंतर पुन्हा मनात आले आणि लेखणी हातात घेतली. बघता-बघता बऱ्याच लघुकथा हातून लिहिल्या गेल्या. चित्रकलेची पण थोडीफार आवड आहे.

लिहिलेल्या कथा प्रकाशित कराव्यात असे मनात आले, मग एकच नाव आठवले “ई-साहित्य प्रकाशन”. त्यांच्या बहुमोल मदतीने हे माझे स्वप्न पूर्ण झाले. त्याबद्दल त्यांचे शतशः आभार. ”

**“अर्पणपत्रिका”**

काही व्यक्ती नसत्या तर माझे आयुष्य घडलेच नसते. जसे आई-बाबा, त्यांच्यामुळेच माझा जन्म आणि माझे सारे सुंदर जीवन घडले. त्यात माझ्या आयुष्यातल्या साथीदाराची म्हणजेच पत्नीची जोड मिळाली, आणि अर्थातच तिच्या आई-दादांमुळे !

म्हणूनच हे माझ्या आयुष्यातले पहिले-वाहिले पुस्तक माझ्या आई-बाबांना आणि माझ्या सासू-सासऱ्यांना कृतज्ञपणेसमर्पित !!!

मिलींद कुलकर्णी

यातील सर्व कथा काल्पनिक असून त्यांचा कोणत्याही जिवीत वा मृत व्यक्ती, स्थळ वा घटनांशी संबंध नाही. या कथा निखळ मनोरंजनासाठी आणि काही सामाजिक संदेश देण्यासाठी असून त्यातून कोनतीही अंधश्रद्धा वा भिती पसरवण्याचा लेखक वा प्रकाशक यांचा हेतू नाही.

## कथानुक्रम


भेट

एक संध्याकाळ

ही वाट दूर जाते !!!

रत्नमाला पॅलेस - दि हॉटेल !!!

सूर महाल : एक आठवण !!!



# भेट

**आज** त्याच्या घरी जायचेच ठरवून झोपेतून उठलो. दुपारचे चार वाजत आले होते. हात पाय धुवून तयार होवून त्याच्या घरी निघालो. त्याने सांगितलेला पत्ता एक वेळ आठवून बाहेर पडलो. आज अचानक त्याच्या घरी भेटून त्याला आश्चर्यचकित करणार होतो. यापूर्वी कधीही त्याच्या घरी गेलो नव्हतो. जाणारच कसा, आठ दहा दिवसापूर्वीच तर ओळख झालेली आणि चांगली मैत्री पण. त्याच्या घरी जात असतानाच आमची एकमेकांशी ओळख झाल्याचा तो प्रसंग आणि दिवस आठवला.

त्या दिवशी खूपच कंटाळा आला होता, म्हणून फिरायला गेलो होतो, गावाबाहेर असणाऱ्या आमराईत. आमराई म्हणजे गावाशेजारी असणारे छोटेसे जंगल. त्या छोट्याश्या जंगलातूनच शेजारच्या गावाला रस्ता जात होता. त्या निर्जन रस्त्यावर वाहनांची आणि माणसांची रहदारी कमीच असे. तासा दीड तासाच्या अंतराने एखाद दुसरे वाहन जात होते. त्या जंगलात रस्त्याच्या जवळच एक छोटंसं तळं होतं. त्या शांत तळ्याकाठी जावून बसलो. संध्याकाळ कधी झाली आणि अंधार कधी झाला कळलेच नाही. निघायचं विचार करतच

होतो इतक्यात, " काय येणार काय?" मागे वळून पाहतो तर अनोळखी माणूस सायकल घेवून रस्त्याच्या कडेला मलाच विचारत उभा असलेला दिसला.

मी उठून त्याच्या जवळ गेलो. साधारण माझ्याच वयाचा म्हणजे वीस बावीस वर्षाचा तो युवक माझ्याकडेच पहात उभा होता. शरीराने किडकिडीत पण माझ्यापेक्षा बराच उंच असणारा तो तरुण एकदम साध्या घरातला वाटला. मी जवळ जाताच छानसं हसला, आणि म्हणाला," काय करताय एकटेच अंधारात?" मी म्हणालो," काही नाही, आलो होतो फिरायला, घरी बसून कंटाळा आला म्हणून, पण परत निघायला वेळ झाला थोडा". "एकटाच जाण्यापेक्षा गप्पा मारत जावं म्हणून विचारलं", तो. " बरं झालं मला पण सोबत झाली परत जाताना" असे म्हणून मी त्याच्या सोबत निघालो. शेजारच्या गावात एका छोट्याशा कारखान्यात तो कामाला असल्याचे त्याच्या कडून कळले. बोलण्याच्या नादात गावात कधी येवून पोहोचलो कळलेच नाही. दुसऱ्या दिवशी पुन्हा भेटण्याच्या आश्वासनाने दोघेही आपापल्या घरी रवाना झालो.

मी रोजच त्या जंगलात फिरायला जावून त्याच्या सोबत गप्पा मारत घरी येवू लागलो. अगदी अनपेक्षितपणे झालेली आमची ओळख एका चांगल्या मैत्रीत बदलू लागली. आमच्या गावाच्या सुरुवातीला असणाऱ्या चौकातूनच तो आपल्या घरी जात होता. त्यामुळे आमची भेट दररोज संध्याकाळीच, आणि त्या जंगलातच होत होती. दिवसा-ढवळया तो गावात कधी दिसलाच नाही, अगदी सुटीच्या दिवशी सुद्धा. मी त्याला बरेच वेळा घरी येण्यासाठी आमंत्रण देत होतो, तो सुद्धा नेहमी हसून येतो फुरसतीने असे म्हणायचा, पण

कधीही येत नव्हता. तो स्वत:तर माझ्या घरी येत नव्हताच पण आपल्या घरी पण मला कधी बोलावत नव्हता.

दोन तीन दिवसापुर्वीची गोष्ट, त्या दिवशी अमावस्या असल्याने बराच अंधार होता. मी रोजच्या प्रमाणे फिरायला गेलो आणि त्याची वाट बघत थांबलो होतो. नेहमीपेक्षा त्यादिवशी उशीराच आला तो. त्याच्या चेहऱ्यावर आज वेगळाच भाव होता. गावाच्या दिशेने दोघेही येत होतो.

आज तो शांतच होता म्हणून," आज उशीर केलास यायला?" मी विचारले.

तर तो काहीच बोलला नाही. का कोणास ठावूक मला पण त्याच्याशी काय बोलावे सुचतच नव्हते.

तरी पण कामाच्या ठिकाणी काही झाले असेल कदाचित असे समजून त्याला बोलते करावे म्हणून काहीतरी बोललो, "किती दाट अंधार आहे नाही आज?"

तर त्याने नुसतीच मान हलवली पण बोलला काहीच नाही.

मला तो अजारी असेल असे वाटले म्हणून," तुला बरं वाटत नाहीये काय?" असे विचारलो.

त्याने नकारार्थी मान हलवली.

आणखी काही बोलावं असा विचार करत असतानाच तो म्हणाला, "मागच्या वर्षी इथे झालेला अपघात बघितलास?"

"नाही बुवा" मी, "ऐकलंय खरं, एका ट्रकनं, एका सायकलने जाणाऱ्या माणसाला धडक दिली होती, असंच काहीतरी घडलं होतं. "

"बरोबर, पण त्या मृताचा संचार आहे म्हणे या परिसरात. तुला जाणवतोय?" इतके बोलून तो पुन्हा गप्प झाला.

मला त्याचं बोलणं काहीसं विचित्रच वाटलं. माझा भूताखेतावर विश्वास नाही, पण का कुणास ठावूक मला त्यावेळी खुपच भीती वाटली.

आतातर मला हा रस्ता कधी एकदा संपतोय असं वाटत होतं. एक तर भरपूर अंधार, उशीर पण झालेला आणि त्यात त्याने असला विषय काढलेला.

शेवटी एकदाचं गाव आलं अन माझा जीव भांड्यात पडला. नेहमीच्या जागी येताच "गुड नाईट, भेटू पुन्हा", असं म्हणून मी निघालो. तो काही न बोलता एकदम विचित्र हसला. त्यानंतर दोन तीन दिवस तो मला भेटलाच नाही.

त्यानंतर दोनतीन दिवस तो मला भेटलाच नाही. अजारी असे समजूनच आज मी त्याच्या घरी चाललो होतो त्याला भेटायला आणि त्याला आश्चर्याचा धक्का द्यायला.

माझ्याच विचारात मी किती वेळ चालत होतो लक्षातच नाही. पाहतो तर तो राहणाऱ्या गल्लीतच मी आलो होतो. त्याने सांगितलेल्या पत्त्यानुसार बरोबर त्याच्या घराजवळ गेलो. घरासमोर उभी असलेली त्याची सायकल बघून तो घरी असल्याची खात्री

झाली. कदाचित तोच दरवाजा उघडणार असं अंदाज बांधून त्या दोन खोल्यांच्या छोट्याशा घराचे दार वाजवलो. काही वेळानी दार उघडले गेले, तर समोर एक मुलगा उभा होता. सोळा सतरा वर्षांचा तो मुलगा चेहऱ्यावरून त्याचा भाऊच वाटत होता.

"कोण पाहिजे?" त्याने विचारले.

मी हसऱ्या चेहऱ्याने तो आहे काय म्हणून विचारलो.

"क्काय ?" असे म्हणत तो त्याच्या भावासारखा दिसणारा मुलगा माझ्याकडे बघतच राहिला.

त्याचे वागणेच समजत नव्हते, त्याच्या या अशा विचित्र प्रश्नाची मला चीड आली, म्हणून थोडे मोठ्यानेच, "तुम्ही त्याचे भाऊ वाटता, होय ना? तो घरी नाहीय का, की कुठे बाहेर गेलाय?"

त्याने विचित्र प्रकारे मान हलवली अन डोळे मोठे करून गूढ नजरेने माझ्याकडे बघू लागला. आता मात्र मला वैताग आला, त्याच्या या अशा वागण्याचा. आपण चुकीच्या घरी तर आलो नाही ना अशी शंका आली, पण सायकल तर तीच आहे.

इतक्यात आतून एक बाई समोर आली, त्याची आई असावी बहुतेक.

मी धाडसाने तिला, " दोन तीन दिवस झाले भेटलाच नाही ना, म्हणून त्यालाच भेटायला आलो होतो. अजारी आहे का?" असे विचारलो.

माझे बोलणे पूर्ण होते ना होते तोच तिच्याही चेहऱ्यावर आठ्या उमटल्या अन ती म्हणाली, "दोन तीन दिवस?"

आता मात्र कमाल झाली, आणि आपलं काही चुकत तर नाही ना? अशी शंका मनात आली.

एवढ्यात त्या मुलाने विचारले, "तुम्ही केव्हा पासून भेटताय त्याला ?"

"जास्त नाही, आठ दहा दिवस झाले असतील फारतर" मी म्हणालो, "आणि एवढ्या दिवसात मैत्री पण चांगली झाली आम्हा दोघांची. "

पांढऱ्या साडीत असणारी त्याची विधवा आई माझ्याकडे डोळे मोठे करून बघत होती, भीतीयुक्त नजरेने. मला तो कसा, कधी आणि कुठे भेटला हे पण सांगून टाकलो. तर तो मुलगा आपल्या आईकडे पाहू लागला आणि तिचे डोळे पाणावल्या सारखे वाटले.

एवढा वेळ दारात थांबवल्या नंतर त्या मुलाने आत बोलावून बसण्यास सांगितले. आणि तो पण चक्क रडू लागला. आता मला समजेना की हे असे काय करतायेत. मी काय करावे हे सुचेनासे झाले म्हणून अस्वस्थपणे रूम मध्ये इकडे तिकडे बघत होतो.

तर तो मुलगा म्हणाला, "माझा दादा मागच्याच वर्षी गेल्या अमावस्येला त्या आमराईत, एका ट्रक अपघातात सायकल वरून पडून - - - - - - - - - - - -"

आणि त्याचे बोलणे ऐकत असतानाच माझी नजर भिंतीवर टांगलेल्या एका फोटोवर पडली, अन एकदम धस्स झाले. माझं डोकं गरगरतय असे वाटू लागले, अंग थरथरु लागले, कारण - - - - - कारण फुलांचा हार घातलेल्या त्या फोटोत माझा मित्रच होता.

त्यांची माफी मागून तिथून कसाबसा मी बाहेर पडलो खरा, पण काय घडतंय समजतच नव्हते. अगदी काल्पनिक आणि भयानक वाटत होत. माझी छाती भीतीने धडधडत होती. त्याला माझ्यातर्फे आपल्या घरच्यांना काही निरोप तर द्यायचा नव्हता ना? पण त्या घराकडे वळून बघण्याचे धाडस सुद्धा मला होत नव्हते.

चाललो होतो भ्रमिष्टासारखा, कुठं चाललोय हेच कळत नव्हते,

पण डोक्यात एकाच विचार पुन्हा पुन्हा येत होता,

"तो माझ्या पत्त्यावर मला भेटायला माझ्या घरी आला तर !!! - - - "

(२५/०३/१९९४)

§§§§§§§§§§§

# एक संध्याकाळ

---

तो दिवस आठवला कि अजूनही माझ्या अंगावर शहारे येतात. खरं सांगायचं तर माझा अशा गोष्टींवर विश्वास बसत नसे. कोणीतरी असं काहीतरी सांगितले तर मी त्याची थट्टा करत असे. आणि म्हणूनच असेल कदाचित, हा प्रसंग मी कुणाला सांगतही नाही; कधीच! नव्हे सांगायचं धाडसंच होत नाही. पण आजही तो प्रसंग आठवला म्हणजे मला फारच भीती वाटते.

पाच सहा वर्षापूर्वी घडलेला तो अविस्मरणीय असा प्रसंग अजूनही माझ्या डोळ्यासमोर जसाच्या तसा उभा रहातो. माझ्या बाबांची बदली झाल्यामुळे आता ते ठिकाण सोडून आम्हाला तीन चार वर्षे झाली आहेत. ज्यावेळी हा प्रसंग घडला त्यावेळी मी बारावीला होतो. माझी बारावीची अंतिम परीक्षा जवळ आल्यामुळे अभ्यासासाठी कॉलेजला सुट्टी होती. त्यामुळे दिवसभर मी घरीच असे, संध्याकाळी मित्रांबरोबर फिरायला जात असे. पण त्या दिवशी माझे कोणीच मित्र आले नाहीत, आणि मी पण कुठे फिरायला गेलोच नाही. का कोणास ठावूक कंटाळा पण आला होता फिरायला जायचा. माझे आईबाबा पण बाहेर गेले होते आणि भाऊपण मित्रांकडे गेले होते. त्यामुळे घरी मी एकटाच होतो.

आमचे घर तसे गावाबाहेरच होते. माझे वडील सरकारी डॉक्टर असल्यामुळे त्यांचा दवाखाना गावाबाहेर होता आणि त्याला लागुनच आमचे घर, ते पण सरकारी. आमच्या घराजवळ हाकेच्या अंतरावर, म्हणजे शंभरेक मीटरच्या अंतरावर तीन चार घरे

होती. बाकी परिसर तसा मोकळा माळच होता. आमच्या घराच्या डाव्या बाजूला काही अंतरावर दुसऱ्या एका डॉक्टरांचे घर होते. तर उजव्या बाजूला काही अंतरावर एक भली मोठी खण होती. घरासमोर मोकळे पटांगण आणि त्यानंतर एक मुख्य रस्ता होता. तो रस्ता त्या खाणी शेजारूनच जात होता.

त्या दिवशी संध्याकाळी मी एकटाच दारात पायरीवर माझ्या आईबाबांची आणि भावांची वाट बघत बसलो होतो. हळू हळू अंधार पडत चालला होता. रस्त्यावर एकही माणूस दिसत नव्हता बराच वेळ बसलो होतो, शेवटी कंटाळून मी उठून घरात जायचा विचार करत होत इतक्यात सगळीकडची लाईट गेली आणि सगळीकडे अंधार पसरला. त्या अंधाराचा मला आणखीनच कंटाळा आला पण काय करणार पर्यायाच नव्हता. लाईटची वाट बघत तसाच बसून राहिलो.

त्या अंधारात इकडे तिकडे बघत बसलो होतो, इतक्यात अचानक माझे लक्ष त्या शेजारच्या खाणीकडे गेले, तर त्या खाणीत काहीतरी चमकल्यासारखे वाटले. म्हणून मी तिथेच पाहू लागलो, तर मला तिथे काहीतरी हलत असल्याचे जाणवले. थोड्या वेळाने ती हलणारी वस्तू चालत असल्या सारखे वाटले. मी एकटक तिकडेच पाहात राहिलो, तर मला ते नक्की काय आहे हेच कळेना. तर ती विचित्र वस्तू खाणीतून चढून रस्त्यावर आली. मग मात्र त्या वस्तुत माणसाचा आकार दिसत होता.

इतक्या रात्री तिथे कोण असेल याचा विचार करत मी तिकडेच बघत होतो. तर ती पांढरे शुभ्र कपडे घातलेली व्यक्ती रस्त्यावरून चालू लागली. हळूहळू चालणारी ती व्यक्ती ओळखीची तर वाटत नव्हती. तिचे कपडे मात्र एकदम पांढरे शुभ्र आणि चमकदार

असल्याचे त्या अंधारात सुद्धा जाणवत होते. नंतर ती व्यक्ती रस्त्यावर तशीच चालत राहिली आणि आमच्या घरा समोरच्या मोकळया जागेतून आमच्या घराकडेच येवू लागली. त्या व्यक्तीच्या शरीरावरचे कपडे वाऱ्यामुळे असे हलत होते जसे काही आत शरीरच नाही. ते बघून मला भीती वाटू लागली.

ती अशी विचित्र आकृती आमच्या घराच्या दाराकडेच येवू लागली. मला दरदरून घाम फुटला. उठून घरात जावं आणि दार बंद करून आत बसावं असे वाटत होते. पण मला बसल्या जागेवरून उठताच येईना. हातापायात त्राण नसल्यासारखे वाटू लागले. एवढे झाले तरी माझी नजर त्या आकृती वरच खिळली होती. माझ्या कडून काय घडतंय अथवा काय घडणार हे मलाच कळत नव्हते. आतातर मला ती आकृती स्पष्टच दिसू लागली. माझ्या छातीत एकदम धस्स झाले आणि लक्षात आले की, त्या आकृतीत शरीर नसून फक्त आणि फक्त कपडेचआहेत, ते पण वाऱ्याने हलणारे! घामाने डबडबलेला मी माझे दोन्ही हात दोन्ही दंडांना घट्ट धरून ठेवले होते. आणि एकटक त्या आकृतीकडे बघत होतो. आकाशात चांदणे असल्यामुळे त्या अदृश्य शरीरावरच्या हलणाऱ्या कपड्यांची सावली पण स्पष्टपणे हलताना दिसत होती.

माझ्यापासून जेमतेम पंधरा वीस फुटावर आलेली ती आकृती माझ्याकडेच चालत येत होती नव्हे सरकत होती. मला काय करावे सुचत नव्हते, काहीतरी फेकून मारायचा विचार करत होतो. पण धाडस होत नव्हते आणि माझ्या दोन्ही दंडांना पकडून ठेवलेले माझे हात सुटतच नव्हते. पाय जमिनीने ओढून घेतल्यासारखे वाटू लागले आणि माझा श्वास घुटमळून कोंडल्यासारखे होवू लागले. मी मदतीसाठी कुणाला तरी बोलवावे म्हणून

ओरडायचा प्रयत्न करू लागलो, पण आवाजच बाहेर येत नव्हता. आतातर ती विचित्र आकृती माझ्या पासून हाताच्या अंतरावर उभी होती. तरी पण मी ओरडण्याचा प्रयत्न करत होतो.

आणि एवढ्यात ! - - - -एवढ्यात माझ्या दोन्ही खांद्यावर कुणीतरी गप्पकन हात ठेवले, मी जोरात किंचाळून मागे वळून पाहतो तर माझा भाऊ माझ्याकडेच बघत उभा होता, त्याचे दोन्ही हात माझ्या खांद्यावर ठेवून. "अरे मी आहे मी, असं एकदम घाबरायला काय झालंय इतकं, किती घामेघूम झाला आहेस. आणि लक्ष कुठे आहे तुझं, मी जवळ जवळ पाच मिनीट झाले तुझ्या मागे येवून थांबलोय, पण तू आपला तुझ्याच तंद्रीत. कसला विचार करतोयस, आणि डोळे एवढे मोठे करून असं काय बघतोयस असं भूत बघितल्यासारखे, काय झालं; का घाबरलास?" असं म्हणत तो माझ्याकडेच बघत होता, आणि मी त्याच्याकडे. "नाही!, काही नाही," असे म्हणत मी त्या समोर उभ्या असलेल्या आकृतीकडे वळून बघतो तर काय, ती आकृती गायब, हो म्हणजे समोर नव्हतीच !

ती आकृती अशी अचानक कुठे गेली, की भास होता म्हणून मी इकडे तिकडे पाहू लागलो, पण ती कुठेच दिसेना. शोधता शोधता सहजच माझी नजर त्या खाणीकडे गेली तर तिथे परत काहीतरी चमकले, अगदी तसेच मघाशी चमकल्या सारखे आणि ते सुद्धा तिथेच अगदी पहिल्या ठिकाणीच. आणि पुन्हा सारे काही शांत झाले, जसं काही काहीच घडले नाही. त्या रात्री मला झोपच लागली नाही; फिरून फिरून ती आकृती, चमकलेली जागा आणि ती खणंच माझ्या डोळयासमोर दिसत होती.

दुसऱ्या दिवशी सकाळी उठून एक कुतूहल म्हणून त्या खाणीत चमकलेल्या ठिकाणी गेलो, तर अंगावर सर्र्र्र्रकन काटाच आला. तिथे कपडे पडलेले दिसलेले, कालच्या सारखेच, अगदी तोच रंग तोच आकार ! मी त्या कपड्यांना हात लावायचा विचार करत होतो पण धाडसंच झाले नाही. मी तसाच घरी परत आलो विचार करत, काय प्रकार असेल याचा.

त्या प्रसंगाचा अजूनही उकल होत नव्हता, आणि आज सुद्धा तोच विचार डोक्याला सतावत असतो. आणि मी एकटाच असलो की मला कधी कधी भास होतो, माझ्या आसपास कोणीतरी असल्याचा, माझ्याकडे कोणीतरी बघत असल्याचा ! याच्याशी त्या प्रसंगासाचा, त्या आकृतीचा काही संबंध तर नसेल ना ? - - - - - - -

(३१/०७/१९९५)

§§§§§§§§§§§

# ***ही वाट दूर जाते !!!***

---

**सं**ध्याकाळची वेळ, थंड वारा सुटलेला होता. त्या शांत वाऱ्याप्रमाणेच आज समुद्र पण शांत वाटत होता. त्याच्या लाटा संथपणे जमिनीकडे येत होत्या आणि परत जात होत्या. इतर वेळी घोंघावणाऱ्या वाऱ्या सोबत रौद्र लाटा देणारा तो अथांग सागर आज कंटाळून संथ झाल्यासारखा वाटत होता. जमिनीकडे येणाऱ्या प्रत्येक लाटेबरोबर काही शंख, शिंपले, छोटे छोटे मासे, खेकडे आणि इतर कीटक सुद्धा जमिनीवर येत होते. त्यातले काही परतणाऱ्या लाटे सोबतच परत सागरात जात होते, तर काही जमिनीवर रहात होते. जमिनीवर राहिलेल्यांपैकी सुद्धा काही परत सागराकडे जाण्याचा प्रयत्न करत होते. त्यांचे जीवनच सागराच्या पाण्यावर अवलंबून असल्यामुळे जगण्याच्या जिद्दीने त्यांचा प्रयत्न चालला होता. पण इतक्यात पुन्हा येणारी ती लाट त्यांना पाण्याबाहेर काढत होती. जगण्या साठीच्या त्या संघर्षात, त्या कीटकांच्या मानसिकतेत बरेच प्रकार जाणवत होते. कोणी परत जाण्यासाठी धडपडत होते, कोणी पुढची लाट आपल्याला परत घेवून जाईल या आशेवर होते. तर कोणी आपण परत पाण्यात जाऊच शकत नाही असा विचार करून निराशपणे त्या वाळूत पडून होते,त्या निर्जीव वाळूप्रमाणेच.

समुद्राकाठच्या एका छोट्याश्या खडकावर बसून मी हा सगळा प्रकार बघत होतो. आणि हा प्रकार आपल्या मानवी जीवनाला किती तंतोतंत लागू होतो याचाच विचार करत होतो. आमच्या घरा समोर राहणाऱ्या सागरचा विचार पटकन माझ्या नजरे समोर आला आणि गूढपणे शून्यात नजर लावून बसलेला त्याचा चेहरा माझ्या समोर दिसू लागला, जीवनाला कंटाळून निष्प्राण वाळूत पडलेल्या त्या निराश कीटकांसारखा. वीस-

बावीसवर्षांचा तो सागर कोणाशीही काहीही बोलत नव्हता, काही बोलले तरी नुसती मान हलवून हो किंवा नाही एवढेच प्रतिसाद द्यायचा. मी जेंव्हा पासून त्याला बघतोय तेंव्हा पासून त्याची गूढ नजर आणि गूढ वागणे काही बदलत नव्हते. मी त्याला ओळखायला लागून एक-दोन महिने झाले असतील पण त्याला मी समजूच शकलो नव्हतो, मीच काय त्याला कोणीच समजू शकत नव्हते. त्याचे आई वडील देखील आपल्या एकुलत्या एका मुलाला समजू शकले नव्हते, कि हा असा का करतोय, याला काय झालंय आणि हा किती दिवस असेच करत राहणार.

*****

पाच सहा महिने झाले असतील त्या गोष्टीला. ऑफिसला सुट्टी असल्यामुळे दुपारी घरीच बसलो होतो. इतक्यात कुणीतरी दरवाजा वाजवला, म्हणून बघतो तर एक थकल्यासारखे वाटणारे गृहस्थ हातात एक कागद घेवून पत्ता विचारण्यासाठी उभे होते. त्या कागदावर आमच्या समोरच्याच रिकाम्या घराचा पत्ता लिहिला होता. मी त्यांना घर दाखवताच ते त्या घराकडे जावून त्या घराचे कुलूप काढू लागले. पाठोपाठ एक बाई आणि एक वीस-बावीस वर्षांचा मुलगा रिक्षातून उतरले आणि त्या घरात गेले. आई वडील आणि मुलगा असावेत असे वाटत होते. पाच सहा बॅगा आणि काही सामान त्या रिक्षातून उतरवून ते गृहस्थच आत नेवू लागले. मदतीसाठी विचारावे म्हणून पुढे गेलो, तर “काही गरज नसल्याचे आणि मदत लागल्यास बोलावतो, आता निघा तुम्ही” असे विक्षिप्तपणे सांगितले. एवढा मोठा मुलगा असून सुद्धा असल्या तिरसट पणामुळे मदतीला येत नसावा असे मनात म्हणत, स्वत:वर चीड चीड करतच घरी आलो. आणि दरवाजा बंद करून खिडकीतून बघू लागलो. सर्व समान आत नेवून एकट्यानेच आत नेवून त्यांनी दरवाजा धाड करून बंद करून घेतला.

त्या दिवशी बंद केलेला दरवाजा त्यानंतर क्वचितच उघडला जात असे. साहजिकच आजूबाजूला राहणाऱ्यांना कुतूहलाचा विषय झाला. कोणी काही विचारायला गेले तर ते गृहस्थ दरवाजा न उघडताच खिडकीतूनच विचारून, मोघम उत्तर द्यायचे, आणि जास्त विचारपूस केली तर या घराच्या घर मालकांना विचारा असे सांगायचे. आजूबाजूच्या लोकांनी न राहवून घर मालकांना म्हणजे शास्त्री सरांना या विषयी विचारायचे ठरवले. सागर आणि त्याचे आई वडील सागरच्या उपचारासाठी काही महिन्यांसाठी इथे राहणार होते. सागरचे वडील बाळासाहेब एका बँकेत नोकरी करत होते पण सागरसाठी त्यांनी सेवानिवृत्ती स्वीकारली होती. आणि आई घर काम करत होती. शास्त्रीसरांना फोन केल्यावर त्यांनी त्यांचे जिवलग मित्र बाळासाहेबांविषयी इतकेच काय ते सांगितले. सागरला नेमका काय आजार आहे आणि कोणता उपचार घेण्यासाठी ते इथे आलेत त्याची उत्सुकता पुन्हा आमच्या सर्वांच्या मनाला भेडसावू लागली. त्याच्या तब्बेती वरून तो आजारी असल्यासारखे वाटत नव्हता. आम्ही पण जास्त चौकशी करण्याच्या भानगडीत पडलो नाही.

कितीही ठरवले कि दुसऱ्याच्या प्रकरणात लक्ष घालायचे नाही, तरीही, हळूहळू एक एक माहिती बाहेर येवू लागली. सागरला कोणता तरी मानसिक आजार होता, तो सदानकदा गप्पच असायचा. कोणाशीही बोलायचा नाही, घराबाहेर यायचा नाही, कधीतरी खिडकीतून बाहेर बघत बसलेला असायचा, शून्यात नजर लावून. त्याची आई काहीतरी कामानिमित्त कधीतरी घराबाहेर यायची, पण लगेचच घरात जायची. त्यांच्या चेहऱ्यावरून त्या बोलक्या स्वभावाच्या वाटत होत्या पण बहुदा तरकट वडिलांच्या धाकामुळे कोणाशी बोलत नसाव्यात. त्याला उपचारासाठी नेतेवेळी जो काही दरवाजा उघडला जायचा तेव्हाच त्या सर्वांचे दर्शन व्हायचे, इतरवेळी दरवाजा बंदच असायचा.

एक दिवस दुपारीच मी माझ्या आई सोबत बाजारात गेलो असता योगायोगाने सागरच्या आई बाजारात औषध घेत असताना दिसल्या. आणि एकट्याच असल्यामुळे असेल

कदाचित आम्हाला ओळखून हसल्या. म्हणून आई आणि मी त्यांच्याजवळ जावून विचारपूस केली तर त्यांच्या डोळयातून पाणीच आले. त्यांना बऱ्याच दिवसानंतर बोलायला थोडा वेळ मिळाल्यामुळे त्या सविस्तरपणे आमच्याशी बोलू लागल्या. त्यांच्या बद्दल असलेल्या माझ्या अंदाजाप्रमाणे त्या खरेच बोलक्या स्वभावाच्या होत्या पण त्यांच्यावर आलेल्या परिस्थितीमुळे त्यांना असे जीवन जगावे लागत होते. शेजारच्या एका बंद दुकानाच्या पायरीवर बसून त्या आमच्या समोरच आपले मन मोकळे करत होत्या. त्यांच्या तोंडून त्यांची व्यथा ऐकून, गरम तेलात पाण्याचा थेंब पडल्याप्रमाणे मनात चर्रर झाले. त्यांचे बोलणे संपवून त्या आमच्या सोबत न येता एकट्याच आपल्या घरी गेल्या, त्यानंतर आम्हीपण थोड्यावेळाने राहिलेली खरेदी करून आमच्या घरी गेलो.

बाजारातून येवून बसलो होतो इतक्यात समोरच्या घराकडे लक्ष गेले. तर सागर आपल्याच तंद्रीत खिडकीतून बाहेर बघत बसला होता. त्याच्या आईचे बोलणे मनातून जातच नव्हते. त्याच्याकडे बघताच मला त्याच्या आईच्या बोलण्यातला चार पाच वर्षा पूर्वीचा सागरच दिसू लागला. अभ्यासात बऱ्यापैकी हुशार असणारा सागर त्याच्या आई वडिलांना एकुलता एक होता. वडिलांसारखाच त्याचा स्वभाव शांत आणि हळवा होता. त्यामुळे त्याला मित्र पण जेमतेमच होते. बारावीला चांगले मार्क्स मिळवल्यानंतर सी. ए. होण्याचे स्वप्न घेवून तो बी. कॉम. च्या पहिल्या वर्षाला जावू लागला. कॉलेज सुरु होवून दोन तीन महिने झाले असतील, वीसेक किलोमीटर अंतरावर असलेल्या शहरात एक कसले तरी प्रदर्शन बघायला बरेच मुले आणि शिक्षक गेले होते. सागर आणि त्याचा एक मित्र मोटर सायकल वरून गेले होते. परत येई पर्यंत सागर तापाने फणफणला होता. पावसात भिजल्यामुळे ताप आला असेल म्हणून आई वडिलांनी डॉक्टर कडे दाखवले; पण त्याचा ताप कमी होतच नव्हता. तशा तपातच तो एक दिवस बेशुद्ध झाला, म्हणून मोठ्या दवाखान्यात दाखविण्यात आले. दोन तीन दिवसांनी तो शुद्धीवर आला, त्यानंतर तो असा विचित्र वागू

लागला. कोणाशीही बोलत नव्हता, शून्यात नजर लावून बसत होता. कधी कधी रात्री अपरात्री उठून डायरीत काहीतरी लिहित बसायचा आणि ती डायरी लपवून ठेवायचा. आई वडील जास्त बोलले तर चिडचिड करत होता स्वत:ला मारून घेत होता. "ही वाट दूर जाते, मला जायचेय त्या दूरच्या वाटेवरून, मी जाणार, स्वत:ला संपवून. "असे बडबडत आत्महत्त्या करण्याची भाषा करत होता. त्यामुळे त्याचे आई बाबा हतबल झाले होते. वेगवेगळे डॉक्टर, वैद्य, उपास-तपास, नवस सर्व काही झाले तरी त्याच्या वागण्यात फरक पडत नव्हता.

जसजसे दिवस सरत होते तसे सागरची मानसिक परिस्थिती बिघडतच चालली होती. त्याचे विक्षिप्त वागणे त्याच्या आईच्या ताकदीच्या बाहेर गेले होते. चार पाच वेळा त्याने आत्महत्त्येचा केलेला प्रयत्न बघून बाळासाहेब म्हणजे सागराच्या बाबांना बँकेतली चांगली नोकरी सोडावी लागली होती. अकाली निवृत्ती स्वीकारावी लागल्यामुळे आणि सागरच्या दवाखान्याच्या खर्चामुळे पैशाची चणचण भासू लागली. त्यामुळे बाळासाहेबांचा शांत असणारा स्वभाव चिडचिडा आणि तरकट झाला. सागरच्या वागण्यामुळे त्यांना त्याच्या सोबतच राहणे अनिवार्य होवू लागले. त्याला काय झालेय कुणालाच कळेनासे झाले. आई वडील कोणाशी तरी बोलू लागले आहेत असे समजताच ते स्वत:विषयीच बोलतात असे वाटून सागर त्रास करून घेत असे. त्यामुळे त्यांना पै-पाहुण्यांशी, मित्रांशी आणि इतर लोकांशी संपर्क ठेवणे देखील मुश्किल होवू लागले. आपले आई बाबा बाहेरच्यांशी फटकून वागतात असे दिसले की त्याला बरे वाटत होते. त्यामुळे त्यांना स्वत:चे जीवन जगणे देखील मुश्किल झाले होते पण मुलाच्या सुखासाठी ते दोघेही आपला मूळ स्वभाव बदलून सहन करत होते. शास्त्रीसरांच्या सल्ल्यानुसार आमच्या शहरातल्या एका चांगल्या मानसोपचार तज्ञाकडे उपचारासाठी ते इथे आले होते. उपचार पूर्ण होईपर्यंत आमच्या समोर रिकामे असलेल्या सरांच्या या घरात ते राहणार होते.

*****

सागरच्या विचारात मी किती वेळ सागर किनाऱ्यावर बसलो होतो कळलेच नाही. घड्याळ बघतो तर संध्याकाळचे सात वाजून गेले होते. लगेचच उठून हॉटेलकडे परतलो. गेले चार दिवस असणारे इथले ऑफिसचे काम संपवून आज घरी जाणार होतो म्हणून लवकरच आलो होतो, रात्रीची बस असल्यामुळे मिळालेल्या वेळेत जवळच असणाऱ्या समुद्राकाठी जावून बसलो होतो. आधीच आवरून ठेवलेली बॅग घेवून हॉटेलची रूम सोडून, जेवलो आणि बस पकडून घरी गेलो. पहाटे साडेतीन-चार वाजता घरी पोहोचल्यामुळे दुसऱ्या दिवशी सकाळी उशिराच उठलो. आवरून ऑफिसला जाण्यासाठी तयार होवून बसलो होतो. इतक्यात समोरच्या घराकडे लक्ष गेले, तर घराला कुलूप. आई-बाबांना विचारताच; त्यांनी रात्री बारा एक वाजता सागरला एका अम्बुलन्स मधून घेवून गेल्याचे समजले, आणि काळजात धस्स झाले. नेमके काय झाले असेल कुणालाच कळाले नाही.

गेल्या चार दिवसाचा टूर रिपोर्ट ऑफिस मध्ये जमा करून इतर कामे करत बसलो होतो, पण सारखा सागरचाच विचार डोक्यात येत होता. नक्की काय झाले असेल, याने स्वत:चे काही बरे-वाईट तर करून घेतले नसेल ना. माहिती काढावी म्हटले तरी कुणाला विचारावे, विचार करून डोके सुन्न झाले होते. कामात लक्ष लागत नसल्यामुळे ऑफिसातून लवकरच घरी गेलो. घरात जात असता कुलूप लावलेल्या सागरच्याच घराकडे लक्ष गेले. आवरून पुन्हा दारात येवून बसलो. इतक्यात समोरच्या घराच्या खिडकी जवळ असणाऱ्या पारिजातकाच्या झाडावर कसली तरी वही अडकलेली दिसली.

कोणी पहायच्या आधीच पटकन ती वही घेवून घरी आलो. खाडाखोड केलेली, मधेच पाने फाडलेली काही वेळा सुवाच्य अक्षरात लिहिलेले तर काही पाने गचाळ अक्षराने खरडलेली ती जुनाट डायरी सागरचीच होती. ती डायरी जशी वाचता येईल तशी वाचत होतो, त्यात मधेच 'ही वाट दूर जाते, मला जायचेय त्या दूरच्या वाटेवरून स्वत:ला संपवून' असे काहीतरी बऱ्याच पानावर लिहिले होते, खोडलेले होते. काही चित्रे गिरगीटली होती,

वाहत्या पाण्यासारखी, पुलाची, मुलीची, फुलांची, झाडाची अशी कशाचाही अर्थ न-लागणारी. लिहिलेली पाने वाचायला सुरुवात केली तर पानांचा क्रमच कळत नव्हता. कधी पुढच्या तर कधी मागच्या तर कधी मधल्या पानावर, तर कधी उलट सुलट असे लिहिलेले होते.

शांत पाण्यावर फेकलेला चपटा दगड जसा पाण्यावर चार पाच टप्प्यांनी आघात करत पाण्यात खोलवर घुसतो, तशी मनावर असंख्य आघात करत हृदयात घुसणारी वेगळीच कहाणी त्या डायरीतून समोर येवू लागली. त्या डायरीमुळे मानसोपचार तज्ञांना त्याच्या वरील उपचारासाठी काही मदत होईल म्हणून शास्त्रीसरांशी संपर्क साधला. तर रात्री सागरने केलेला आत्महत्त्येचा प्रयत्न त्याच्या दृष्टीने यशस्वी झाल्याचे शास्त्रीसरांकडून ऐकल्यावर छाती धड धडू लागली. डोळयातून अपोआप अश्रूंची सरिता वाहू लागली. अशा तऱ्हेने एक सागर नावाचे नैराश्याचे पर्व अकाली संपले होते, बरेच प्रश्नचिन्ह ठेवून, जे थोड्या फार प्रमाणात मला उलगडले होते.

पुन्हा ती डायरी वाचू लागलो आणखी काही अर्थ निघतो का म्हणून. जस जसा त्याची डायरी वाचून त्यातील लिखाणाचा अर्थ लागू लागला, तसा सागरच आपली कहाणी सांगत असल्याचा मला भास होवू लागला.

*****

जणू तो बोलत होता आणि मी ऐकत होतो,

बारावी पूर्ण झाल्यानंतर मी कॉलेजला जावू लागलो. कॉलेज सुरु होवून चार पाच दिवस झाले असतील, इतक्यात आमच्या वर्गात एक मुलगी आली, सरिता. एकदम साधी. तेल लावून वेणी घातलेल्या केसात पारिजातकाच्या फुलांचा गजरा घातलेली आणि

साधे कपडे घातलेली. ती आत आल्यानंतर अगदी शेवटच्या बेंच वर जावून बसली. कोणाशीही बोलत नव्हती, काही विचारले तर जेमतेमच उत्तर द्यायची. क्लासमधील मुले तिला चाची म्हणून चिडवत होती. ती आली कि तिला 'चिकणी चुपडी, चिकणी चुपडी चाची' म्हणून चिडवायचे तरी ती काहीही प्रतिसाद न देता, खाली मान घालून जायची, तक्रार पण करत नव्हती. का माहित नाही पण तिच्या विषयी मला काही वेगळेच वाटायचे, म्हणजे नेहमी ती कसल्यातरी दडपणाखाली असल्यासारखी वागायची. त्यामुळेच असेल कदाचित तिला चीडवणाऱ्या त्या मुलांचा मला राग यायचा. शक्यतो क्लास मध्ये येतानाच उशिरा यायची आणि क्लास संपताच लगेचच जायची, त्यामुळे तिला काही विचारावे म्हटले तर तिच्या सोबत बोलायला मिळायचेच नाही. आणि मी जरी कधी तिच्याशी बोलायचा प्रयत्न केला तरी ती बोलत नव्हती. मी पण मागच्याच बेंच वर बसायला लागलो. माझे लक्ष तिच्याकडेच असे, मला एक कळत नव्हते ती क्लास सुरु असताना नकळत मध्ये मधेच रडल्यासारखे वाटायची. काही दिवसांनी इतकेच कळले कि, हेड मास्तर असलेल्या तिच्या बाबांची नुकतीच इथल्या सरकारी शाळेत बदली झाली होती. ती फारच लहान असताना तिची आई वारल्यामुळे ती आणि तिचे बाबा दोघेच राहत होते, त्यामुळे सगळे घरकाम करून ती कॉलेज मध्ये येत होती.

क्लासेस संपून अर्धा-एक तास झाला तरी आज पाऊस काही थांबत नव्हता. सगळेजण आपापल्या सोयी प्रमाणे पावसातूनच निघून गेले होते. मी पण निघायचे म्हणून छत्री उघडली, इतक्यात क्लासच्या खिडकीतून सरिता पहात असल्याची दिसली. तिच्याकडे छत्री नसल्यामुळे ती क्लास मधेच उभी होती. मी तिला घरी सोडण्याविषयी विचारले, बरेच आढे-वेढे घेत शेवटी ती माझ्यासोबत येण्यास तयार झाली. पावसात तिच्या सोबत

छत्रीतून जात असताना पारिजातकाच्या फुलांचा मंद सुगंध येत होता. शाळेजवळच असणाऱ्या घराचे दार वाजवताच तिच्या बाबांनी दरवाजा उघ डले. ती पटकन घरात गेली, मी त्यांना माझी ओळख करून दिली, त्यांनी 'ठीकाय' असे म्हणून दरवाजा बंद करून घेतला. दोन तीन दिवस झाले तरी ती कॉलेजला आली नाही. म्हणून मी तिच्या घरी गेलो तर घराला कुलूप होते, अचानक बाहेर गावी गेले असतील बहुतेक.

आठ दहा दिवसानंतर शेजारच्याच शहरात असणारे एक प्रदर्शन बघायला मी आणि माझा एक मित्र गेलो होतो. प्रदर्शन संपल्यानंतर माझा मित्र तिथेच राहणाऱ्या त्याच्या नातेवाईकांकडे गेल्यामुळे मी एकटाच मोटार सायकल वरून घरी येत होतो. दुपारी सुरु झालेला पाऊस थोडा कमी झाला होता, अंधार पडू लागला होता. शहराबाहेर येताच कुणीतरी गाडी थांबवण्यासाठी हात करत होते. त्या निर्जन रस्त्यावर एक बाई आणि त्या हात करणाऱ्या माणसाशिवाय कोणीच दिसत नव्हते, म्हणून बाईक थांबवली.

"माझ्या मुलीला नदीजवळ सोडता का?" त्या माणसाने विचारले.

मी "हो", म्हणताच त्या माणसाच्या आणि बाईच्या मागे उभी असलेली एक मुलगी माझ्यामागे बसली.

मी निघालो, काही वेळाने मला पारिजातकाच्या फुलांचा सुगंध आला, अगदी तसाच त्या दिवशी पावसात आला होता तसा.

"कसे आहात, बरे आहात का?" तो आवाज सरिताचाच होता.

माझ्या मागे सरिताच आहे हे जाणवतच, मी दचकुन "हो, तुम्ही कसे आहात? आणि कुठे गेला होतात आठ दहा दिवसापासून?"

"ही वाट दूर जाते ना, तिथे गेले मी, स्वप्नामधील गावात,"- ती.

"म्हणजे? ही वाट दूर जाते; स्वप्नामधील गावा, माझ्या मनातला का; तेथे असेल रावा. असे म्हणायचे आहे का तुम्हाला. "- मला काहीच कळाले नाही म्हणून विचारलो.

"नाही, तसे नाही पण सांगते, सगळं काही सांगते, बरंच लांब जायचंय आपल्याला तो पर्यंत सगळं सांगते. "- ती.

मला खरंच वाटत नव्हते की काय घडतंय, सरिता माझ्या सोबत बाईकवर बसली होती. हा भास होता कि चमत्कार, कि ती म्हटल्यासारखे स्वप्नातल्या गावात जाणाऱ्या वाटेवरून आम्ही जात होतो? पण ती असं का म्हणत होती, "ही वाट दूर जाते, तिथे गेले मी, स्वप्नातल्या गावात," ती पण अगदी मनमोकळे पणाने बोलत होती, कॉलेज मधल्या तिच्या अबोल पणाला एकदम विपरीत होते तिचे वागणे.

मी शांतपणे तिचे बोलणे ऐकत बाईक चालवत असताना कळले की, तिच्या जन्माच्या वेळीच तिची आई गेल्यामुळे तिचे बाबा तिच्यावर रागराग करायचे. इतके की तिला मारायचे सुद्धा. तितकेच प्रेम देखील करायचे तिच्यावर. त्यांचा स्वभाव विक्षिप्त झाला होता पत्नीच्या निधनानंतर.

त्यांना जेंव्हा राग यायचा तेंव्हा ते तिला, " जन्मताच माझ्या बायकोला म्हणजे स्वत:च्या आईला गीळलीस, आता मला पण गीळणार आहेस काय?" असे आणखी बरेच

काही म्हणायचे. आपलेच बाबा आहेत त्यांच्या भावना आपल्या शिवाय कोण समजणार असं विचार करून ती सारं काही सहन करत होती.

त्या दिवशी पण असेच झाले होते, मी तिला घरी सोडल्याबद्दल त्यांना तिचा राग आला होता आणि तिला वाईट वाईट बोलून इतके मारले होते की त्याच रात्री ती घरातून पळून गेली होती.

तिचे बोलणे अडवत मी मधेच विचारले, "त्यानंतर कोठे गेलात तुम्ही? आणि सध्या बाबा कुठे आहेत?"

ती -" सध्या आम्ही एकत्रच असतो, आई बाबा आणि मी. आत्ता मला तुमच्यासोबत पाठवणारे ते बाबाच होते माझे, माझ्या आई सोबत. मी पण पहिल्यांदाच बघितलं तिला, माझ्या आईला. तुमच्यामुळेच, तुम्ही त्या दिवशी मला घरी सोडले नसते तर हे घडलेच नसते कदाचित. "

मला त्या माणसाचा चेहरा तिच्या बाबांसारखाच वाटला होता, पण मी पाऊस असल्यामुळे निरखून पहिला नव्हता. आणि बहुतेक मला पण त्यांनी ओळखले नसावे.

"म्हणजे तुमच्या बाबांनी दुसरे लग्न केलं का?" - मी.

“छे हो, तसं करायचं असतं तर तेंव्हाच केलं असतं, माझ्या लहानपणीच" - ती.

"तुम्हाला तुमच्या घरी सोडू ना?" - मी विषय बदलण्यासाठी विचारलो, कारण तिचं बोलणे काहीच कळत नव्हते.

"नको इथेच सोडा मला नदीजवळच, आई बाबा पण आलेतच आपल्या पाठोपाठ. " - ती.

नक्की काय प्रकार असेल याचा विचार करत होतो. बराच अंधार झाल्यामुळे जोरात बाईक चालवत निघालो होतो.

नदी जवळ येताच गाडी थांबवली डोक्यात राहून राहून एकाच विचार येत होता, "इथे नदीजवळ काय काम असेल हिचे? त्या दिवशी ही घर सोडून कुठे गेली असेल आणि इतके दिवस कुठे गेले होते हे?"

"अहो सांगते म्हटले ना? सारखा तोच तोच विचार काय करताय मनातल्या मनात. " – ती हसत म्हणाली.

आता माझ्या मनातले हिला कसे काय कळले असा विचार करत होतो.

"एवढा विचार करण्यासारखं काहीच नाही, मी स्पष्टच बोलते. " ती, " त्या दिवशी तुम्ही मला सोडायला घरी आलात हेच कारण झाले बाबांना, मला रागावण्यासाठी. त्या दिवशी इतके रागावले, इतके मारले कि मी ठरविले तिला आज बघायचंच, जिच्यामुळे बाबा माझा तिरस्कार करतात तिला बघणारच. पण बघणार कसे, म्हणून मी जशी नुकतीच घरी आले होते तशीच घरातून पळत सुटले. बाबा पण घराला कुलूप लावून माझ्या मागेच आले. मी इथे नदीजवळ आले इतक्यात मला ती बोलवत असलेली दिसली, माझी आई. ते बघा तिथे, दिसली का? तिथे त्या पाण्यात, दोन्ही हात पुढे करून मला मिठीत घेण्यासाठी आतुर असलेली. बाबा मला थांबवत होते पण मला ओढ लागली होती आईला भेटण्याची. म्हणून मी इथूनच उडी मारली होती या इथूनच, या पाण्यात. माझ्या पाठोपाठ बाबांनी पण उडी मारली होती इथूनच, हे बघा अशी. ”

"ही वाट दूर जाते, स्वप्नामधील गावा. माझ्या मनातला का तेथे असे विसावा. "

असे म्हणत तिने हसत हसत त्या पुलाच्या कठड्यावरून त्या दुथडी भरून वाहणाऱ्या नदीत स्वत:ला झोकावून दिले. उडी मारताच नदीतील पाणी माझ्या अंगावर उडाले, आधीच पावसाच्या पाण्याने भिजलेले माझे अंग पुन्हा भिजले, आता सरितेच्या पाण्याने.

मला पण इच्छा होत होती तिच्या पाठोपाठ त्या दुरवर जाणाऱ्या वाटेवरून, स्वप्नामधील गावात जाण्याची. पण मी बघत होतो स्तब्धपणे, फक्त बघत होतो. थरथर कापणाऱ्या अंगाने बघत होतो. एक सरिता वाहात होती; दुसरी सरिता पण वाहात होती सरिते सोबत, सरीतेत सामावून, सागरला सोडून सागराला मिळण्यासाठी.

घाबरून पटकन बाईक वर बसून घरी निघालो पण मन म्हणत होते.

"ही वाट दूर जाते, स्वप्नामधील गावा, स्वप्नामधील गावा,

माझ्याही मनातला का तेथे असे विसावा, तेथे असे विसावा. " !!!!!"

(२८/१०/२०१५)

§§§§§§§§§§§

# रत्नमाला पॅलेस - दि हॉटेल !!!

"दादा, थोडी हळू घ्या हं या रस्त्यावर, मला ही साईट पाहायचीय, थांबवू नका, सध्या तरी कार-मधूनच पाहू. " - असे ड्रायव्हरला सांगत ती चोहोबाजूने दगडी भिंतीचे मजबूत कुंपण असलेल्या मोकळया जागेच्या मधोमध असणाऱ्या कौलारू घराकडे पाहू लागली.

दोन वन-वेच्या च्या मधोमध असणारा पाऊण-एकराचा तो शंकरपाळीच्या आकाराचा चौकोनी प्लॉट, चारही बाजूंनी भरपूर जागा सोडून मधोमध असलेले ते एकदम जुनाट पण प्रशस्त असे दुमजली कौलारू घर. सात-आठ कार पार्क करता येतील असा घरासमोर असणारा पार्किंग शेड. दोन्ही रस्त्याला उघडणारे, पण सध्या बंद असलेले जुन्या पद्धतीचे गेट. बरीच झाडे, भरपूर झुडूप उगवलेले, त्यांचा बऱ्याच दिवसापासून पडलेला पालापाचोळा. प्लॉटच्या एका कोपऱ्यावर आतमध्ये तोंड करून काळया दगडात कोरलेला, पालापाचोळयांनी झाकलेला कोणाचा तरी जुनाट पुतळा. प्लॉटच्या बाहेर एका बाजूच्या भिंतीला खेटून रस्त्यालगतच असलेली फुलांची पंधरा-वीस दुकाने.

अशी साईट पाहता-पाहता ड्रायव्हरला जाण्यासाठी हात करत, फोनवर बोलू लागली,

"अरे सागर, इथे बस-स्टॅन्ड समोरून उजवीकडे जाणाऱ्या रोडवर अगदी दोन-अडीचशे मीटर जवळच पूर्वेकडे एक चौक लागतो बघ, जिथून वन-वे आहे ना, त्या दोन्ही वन-वेच्या बरोबर मधोमध एक मोठ्ठा प्लॉट आहे, हॉटेल रत्नमाला पॅलेसच्या समोर, एक जुनाट कौलारू घर पण आहे तिथे. तो प्लॉट घेऊन आपण डेव्हलप केला तर?"

"अरे खरंच की, मी पण बरेचवेळा पाहिलीय ती लोकेशन, पण कधी माझ्या डोक्यातच आली नाही बघ. रियली ग्रेट सरिता ! जबरदस्त बिझनेस माईंड आहे तुझं. " - सागर आपल्या पत्नीच्या थिंकिंगपॉवर वर खुश होऊन म्हणाला.

"ठीक आहे, प्रत्यक्ष भेटल्यानंतर बोलू आपण. माझं कोर्टाचं काम आटोपलंय मी निघालेय. तीनचार तासातच म्हणजे संध्याकाळ पर्यंत पोहोचू आम्ही. " - सरिता.

'खरंच अजून पर्यंत कोणत्याच स्थानिक बिल्डरच्या नजरेत कशी काय आली नसेल ही साईट?' स्थानिक बिल्डरच्या नजरेतून ही साईट सुटावी; पण आपल्या बायकोच्या चाणाक्ष नजरेतून न-सुटावी, याचे मनोमन कौतुक करतच त्याने फोन ठेवला.

सागर आणि सरिता दोघांच्याही डोक्यातून ती साईट जात नव्हती. रात्री झोपेत सुद्धा ! रात्री दोन-अडीच वाजता त्याने तिला उठवत विचारले, "सरिता, मला एक सांग तिथल्या व्हॅल्युएशन प्रमाणे वीस-बावीस करोड असेल नाही त्याची किंमत?"

"हो, अरे पण ही काय विचारायची वेळ आहे काय? झोप आता, सकाळी बोलू" - ती.

"पण मला झोपच लागत नाही, तू सांगितल्यापासून नजरेसमोर तीच लोकेशन दिसतेय. जणू मला खुणावतोय ती जागा, झपाटल्यासारखी. " - तो.

"ठीकाय, उद्या सकाळीच जाऊ आपण ती साईट पाहायला, मला पण तसा कामाचा काहीच लोड नाही दोन-तीन दिवस, पण आत्ता शांतपणे झोप. " - ती.

दोन्ही वन-वे च्या मधोमध असणारा पाऊण एकराचा तो प्लॉट त्या दोघांच्या मनात खूपच बसला होता. कधी एकदा तिथे जातो आणि व्यवहार पूर्ण करून त्याचा ताबा घेतो असे त्याना झाले होते. आणि या विचारानेच त्यादिवशी सकाळी लवकर निघून बारा-साडेबारा वाजता इथे पोहोचले होते. वन-वेवर असणाऱ्या हॉलिडे-इन हॉटेलमध्ये अगोदर सांगूनसुद्धा रूम न-मिळाल्यामुळे दोघांची थोडी निराशा झाली, पण त्याच्या समोर असणाऱ्या 'रत्नमाला पॅलेस -दि हॉटेल' मध्ये त्यांना रूम मिळाली. त्या जागेचा व्यवहार पूर्ण करून जायचा बेत आखून सर्व तयारीनिशी ते दोघेही आले होते. आपल्या शहरात असणाऱ्या घरावर आणि गावाकडे असणाऱ्या शेतावर कर्ज काढून हा व्यवहार पूर्ण करायचा, पण आपल्याकडे असणारे दीड-दोन करोड देऊन व्यवहाराला सुरुवात करायची, असा सर्वसाधारण प्लॅनिंग करून ते आले होते.

रत्नमाला पॅलेसमध्ये तिसऱ्या मजल्यावर मिळालेल्या रूम मधून ती साईट पूर्णपणे आणि स्पष्टपणे दिसत होती. तिथली इमारत, झाडी, बगीचा आणि त्या जागेचा आकार बघून दोघेही खूपच खुश होते. संध्याकाळी सागर आणि सरिताने त्या प्लॉट विषयी चौकशी सुरू केली. प्लॉटच्या दगडी कुंपणाला लागून असलेल्या फुले आणि बुके विकणाऱ्या दुकानात त्यांनी त्या प्लॉटविषयी चौकशी केली, पण कोणीही काहीच सांगू शकले नाही. गेटवर बसलेल्या वाचमनला त्या जागेच्या मालकाविषयी विचारले तर त्याला मालक कोण आहे?, कुठे असतो? काहीच माहीत नव्हते. त्या वाचमनवर वैतागलेल्या सागरने शहरातल्या मोठमोठ्या ब्रोकर आणि इस्टेट एजंटकडे त्या प्रॉपर्टी विषयी चौकशी केली. सरिताने पण आपल्या परीने, आपल्या ओळखीचा वापर करून त्या प्लॉटविषयी माहिती

काढण्याचा खूप प्रयत्न केला, पण काहीच माहिती मिळत नव्हती. दोन-तीन दिवस झाले तरी त्या प्रॉपर्टीच्या मालकाचा शोध लागत नव्हता म्हणून दोघेही वैतागले होते.

तीन-चार दिवस उलटून गेले तरी हाती काहीच न लागल्याने, दोघेही हताश झाले. पहाटे आपल्या गावाकडे परत निघण्याचे ड्रायव्हरला सांगून, खिडकीतून त्या साईटकडे निराशपणे बघत ते दोघेही लवकरच झोपले. नजरेसमोरून ती साईट काही जात नव्हती, पण बऱ्याच वेळानंतर दोघांनाही झोप लागली.

दोघेही झोपेत असतानाच त्यांच्या रूम मधल्या फोनची बेल वाजली,

झोपमोड झाल्यामुळे वैतागून त्याने," हॅलो ! " म्हणताच,

"हॅलो, एक्सट्रीमली सॉरी सर, मी रिसेप्शन मधून बोलतोय. सर आपल्याला भेटायला कोणीतरी रावबहाद्दूर आलेत. " - हॉटेलचा मॅनेजर.

"क्काय, कोण हे रावबहाद्दूर?, काय काम आहे?"- घड्याळाकडे बघत सागर, "आणि किती वाजलेत पाहिलंय का आता? अहो, रात्रीचे साडे अकरा वाजून गेलेत. "

"माफ करा साहेब, तुम्हाला भेटून, तुमच्याशी काहीतरी अति-महत्त्वाचे बोलायचे आहे म्हणत आहेत, मी बरंच समजावून सांगितले तरी ऐकायलाच तयार नाहीत साहेब. " - हॉटेल मॅनेजर.

"द्या त्यांना, मी बोलतो. " - सागर

मॅनेजर कडून फोन घेऊन रावबहाद्दूर, "नमस्कार सरकार, मी रावबहाद्दूर बोलतुय. भेटायचं होतं आपणाला. त्या जागेबाबत, तुम्ही घ्यावी म्हणताय ती जागा. "

त्या चिरक्या आवाजात बोलणाऱ्या माणसाचा राग आला होता, पण जागेचे नाव घेताच तो एका हाताने हलवून सरिताला उठवत, स्वतःपण एकदम उठून बसला आणि, "बोला. " म्हणाला.

"माफी असावी सरकार, प्रत्यक्ष भेटू शकतो काय आत्ता. कारण आम्ही उद्या चाललोय पर-मुलुखात. " -तो माणूस.

सरिताकडे पहात, "ठीक आहे या भेटू आत्ताच. " - असे म्हणून सागरने मॅनेजरला पाच-दहा मिनिटांनी त्याला रूम मध्ये पाठवण्यास सांगितले.

दोघेही आवरून त्या माणसाची वाट बघत सोफ्यावर बसले. रात्रीचे बारा वाजले आणि रूमची बेल वाजली. त्याने दरवाजा उघडताच, एका रूम-अटेण्डरसोबत तो माणूस आला. सागरने दिलेल्या चहाची ऑर्डर घेऊन तो अटेण्डर परत गेला, आणि त्या माणसाने कमरेत वाकून दोन्ही हात जोडून; आदबीने,

"नमस्कार सरकार, नमस्कार वैनीसरकार, माफी असावी, आम्ही रावबहाद्दूर घुले, त्या मालमत्तेचा-गुमास्ता, म्हंजे तुमच्या भाषेत पॉपर्टी-एजंट. " पान खाऊन लाल रंगलेल्या ओठामधून, लाल-काळे किळसवाणे दात दाखवून हसत म्हणाला.

'रावबहाद्दूर' नाव ऐकून कोणीतरी रुबाबदार माणूस असेल असे कल्पना केलेल्या सरिता-सागरला तो काळा-सावळा किडकिडीत, मळकट पांढरा-सदरा, ढगळ-पायजमा घातलेला, वरच्या ओठांबरोबर बारीक मिशांची कोरीव लाईन-घोटून दाढी केलेली, उजव्या काखेत लेदरची छोटीशी जुनाट काळी बॅग हाताने दाबून धरून, डाव्या खांद्यावर एक खादीची-नॅपकिन टाकलेला, डोक्यावर तिरकी गांधी-टोपी, डोळे बारीक मिचकवत, चिरक्या आवाजात बोलणारा, पन्नास-बावन्न वर्षाचा, नावाशी विपरीत असणारा 'रावबहाद्दूर' बघायला मिळाला.

एखाद्याने आदबीने बोलावं, पण किती? समोरच्याला त्याची कीव वाटावी, किंवा राग यावा इतका आदबीने तो बोलत होता. आणि नेमका याचाच सागर-सरिताला राग येत होता.

"माजा राग आलाय का सरकार आपणांस?" - तो अचानक बोलून गेला.

"अहो, नाही नाही रावबहाद्दूर, बोला आपण. " - ओशाळून सागर.

"सरकार, लाजवताय का काय आम्हाला, रावबहाद्दूर म्हणून? आपण सरकार, राघू म्हणा आम्हाला, चालंल. " पुन्हा राग यावा अशा आदबीने हात जोडत, वाकून तो म्हणाला.

"ठीक आहे, ठीक आहे, कामाचे बोलूया का आता?" – न-रहावून सरिता मधेच म्हणाली.

"जी वैनीसरकार, तर ऐतिहासिक पार्श्वभूमी असलेली मालमत्ता घ्यायचा तुमचा निर्णय चांगला हाय. " - तोंडातले पान चघळत रावबहाद्दूर घुले म्हणजे राघू.

“म्हणजे?” - दोघेही एकदमच.

"सरकार, म्हंजे त्याचं असं हाय, आपल्या राजांच्या राज्याच्या तीन वाटण्या झाल्या, त्यात तिसरी वाटणी म्हंजे आमचं हे गाव. पूर्वी एवढं मोठ्ठ नव्हतं. गावाचं शहर, शहराचं नगर, नगराचं महानगर झालं. साठ-पासट वर्सापूर्वी गावाबाहेर म्हणून बांधलेलं हे बसस्टँड आता मध्यवर्ती झालं, म्हणजे काय? शहर लईच मोठ्ठ झालं, महानगर !" - डोळे बारीक करत राघू.

"अहो ते सगळं सांगायची काही गरज आहे काय आत्ता?, मुद्द्याचं बोला, उगाच टाईमपास करू नका. " - सागर.

"सरकार, टाईमपास म्हंजे वेळकाढूपणा? कसाकाय? अहो ही ऐतिहासिक मालमत्ता घेणार हाय तुमी, म्हटल्यावर ह्याचा इतिहास म्हंजे तुमच्या भाषेत हिश्ट्री माहीत असायला पाहिजेल का नको तुम्हाला? आणि आम्ही तुम्हाला सांगितल्या बिगर राहणार नाही. यापुढं नुसतं ऐकायचं मध्ये-मध्ये अजिबात बोलायचं नाही, समजलं?" - राघुनं दिलेली प्रेमळ धमकी ऐकून, गालातल्या गालात हसणाऱ्या सरिताकडे पहात सागर गप्पच बसला.

इतक्यात चहा आला. "आधी चहा घ्या मग बोलू. " असे सरिता म्हणताच,

"जी वैनीसरकार !" म्हणत इतका वेळ उभा असणारा राघू हातातली काळी बॅग जमिनीवर ठेवून वॉश-बेसिनजवळ गेला आणि जोरात खाकरून त्याने चुळ भरली, खांद्यावरच्या नॅपकिनने तोंड पुसत, चहाचा कप हातात घेऊन, भिंतीला टेकून खाली बसला. त्याच्या अशा हरकतीने चिडलेल्या सागरने त्याला खुर्चीवर बसण्याचा आग्रह केला, तर पुन्हा आदबीने हात जोडत तो खालीच बसला.

आणि फुर्रकन आवाज करून चहा पीत बोलू लागला, "आता जास्तीची लांबड न्हाई लावत, थोडक्यात आटोपते घेतो. तर राजांच्या तिसऱ्या वंशजाने ही जमीन त्यांच्या सेनापतीला इनाम दिली होती, सेनापतींनी ही जमीन आपल्या पोरीच्या म्हंजे रत्नमालेच्या नावे केली. पुढं रत्नमाला म्हंजे ताई-सरकारांनी परजातीतल्या माणसाशी लग्न केल्याने तिला घराबाहेर काढले. तेंव्हा ताई-सरकारांनी ह्या आपल्या हक्काच्या जागेवर ही हवेली बांधली. काही दिवसांनी ताई-सरकारांच्या नवऱ्याची कुणीतरी हत्त्या केली, चिडलेल्या ताई-

सरकारांनी हवेलीच्या आवारात, जिथं हत्त्या झाली त्या जागेवरच आपल्या नवऱ्याचा पुतळा उभारला. नंतर ताई-सरकारांचे काय झाले? त्या कुठं गेल्या? अंदाजे दोनशे-वर्षे होऊन गेली, पण कुणालाच काहीच कळलेले नाही, आजपतूर. "

डोळे बारीक करून, खाली बघत सांगणाऱ्या रावबहाद्दूरने डोळे पुसत सागर-सरिताकडे पाहिले आणि आपल्या जवळची काळी बॅग उघडून त्यातून पानाची-चंची बाहेर काढत, खालच्या ओठावर उजव्या हाताचे अंगठ्याजवळचे बोट दाबत म्हणाला, "जरा चोच रंगवू का सरकार?"

तो काय म्हणतोय हे न-कळल्याने प्रश्नार्थक चेहरा केलेल्या त्या दोघांकडे बघत तो पुन्हा म्हणाला, "म्हंजे जरा पान खाऊ का? असं म्हणालो. आमच्या नावात राघू हाय ना म्हणून पान खाण्याला चोच रंगवू का म्हणालो?" असे म्हणत त्यांच्या होकाराची वाट न-बघताच हसत-हसत तो रूमच्या गॅलरीत पान खाण्यासाठी गेला.

"तुला राघू कशाला, पोपटपंची म्हणायला हवे खरेतर, कामाचं सोडून नुसती पोपटपंची लावलीय आल्यापासून. फुकट झोपमोड केली. काही काम होणारेय असे वाटत नाही याच्या कडून, पोपटपंची कुठला. " वैतागून सागर पत्नीकडे बघत त्याला ऐकू न-येईल अशा बारीक आवाजात म्हणाला.

"सरकार, पोपटपंची म्हणालात तरी चालेल बरं का आपण आम्हाला राघू म्हणण्यापेक्षा, चला आता कामाचं बोलू. "तो आत येत, आपले लाल-काळे दात दाखवत हसत म्हणाला.

'हळू आवाजात बोललेले याला कसे काय कळले, की असाच अंदाजानेच फेकतोय हा?' असं दोघेही विचार करत असतानाच;

तो म्हणाला, "जाऊदे सरकार; आता माझ्याकडं लक्ष द्या, कामाचं बोलतो, तशी ही जागा बरीच मोट्ठी होती पण हवेलीच्या आसपासची सोडून बाकीची जागा कुणी विकली, काही सरकारनं काबीज केली. हे हॉटेल रत्नमाला पॅलेस पण ताई-सरकारांच्याच नावे बांधलंय, त्यांच्या एका नातलगान. पुढं ही शिल्लक मालमत्ता बऱ्याच लोकांनी विकत घेतली आणि विकली. आता ती हवेलीसकट अरविंदराव सरकारांच्या नावे हाय. तुमच्या एवढंच असतील अरविंदराव सरपोतदार साधारण पस्तीस-चाळीस वर्षाचे. त्यांनीपण सात वर्षानंतर विकायला काढलीय ही मालमत्ता, मलाच सांगितलंय गिऱ्हाईक बघायला. तुमी घेणाराय असं कळल्यावर मी ताबडतोब तुमाला भेटायला आलो. आता बोला सरकार. "

"एक सांगा, किती स्क्वेअर-फूट असेल ही जागा. " - सरिता.

"वैनीसरकार, आपल्याला त्या फुटातलं काय पण कळत न्हाई, पण त्येत्तीस गुंठ्याला एक टीचपण कमी भरणार नाय, वीतभर ज्यादाच भरंल. " - राघू.

तेहेतीस गुंठे म्हंजे किती? अशा प्रश्नार्थक नजरेने बघणार हे माहीत असलेला सागर लगेचच कॅल्कुलेटर मध्ये तेहतीस गुणिले तेहतीस गुणिले तेहतीस असे कॅल्कुलेट करून पस्तीस हजार नऊशे सदोतीस स्क्वेअर-फूट असे सरिताला म्हणाला.

"काय रेट लावलाय, त्या प्रॉपर्टीचा?"- सागर.

"रेट म्हंजे किंमत?, खरं सांगू सरकार, सध्या नड हाय त्या पक्षाला म्हंजे त्या पार्टीला; लकवा मारलाय अरविंद-सरकारांना; म्हंजे पॅरालिशिस, म्हणून वैनी-सरकार आणि भैय्या-साब म्हणजे वैनी-सरकारांचे भाऊच बघत्यात सारा कारभार. पॉपर्टीची किंमत

बाजारभावापेक्षा कमीच लावली हाय, यात कायबी कमी होणार न्हाय, एकच दाम, तुमच्या भाषेत एकदम फायनल. पंधरा कोटी; हवेलीतल्या भरल्या सामानासकट, पटलं तर होय म्हना न्हायतर न्हाई. "

ह्या एरियात आपण चौकशी केलेल्या किमतीपेक्षा ही किंमत बरीच कमी होती. त्यामुळे सागर आणि सरिताने एकमेकांशी चर्चा करून लगेचच त्याला होकार कळवला.

"त्यात, तुमचे कमिशन किती?" - सागर.

राघू उठून पुन्हा आदबीने हात जोडत, "कमिशन म्हंजे मोबदला? सरकार तुमच्याकडनं जास्त काय घ्यायचं. तुम्ही खाल्लेल्या भाकरीतला ताटाबाहेर पडलेला एक तुकडा म्हणनासा, म्हंजे ठरलेल्या व्यवहाराच्या, हजाराला पाच रुपये द्या. यात पण काय बी कमी नाय सरकार. "

आकडेमोड करून साडेसात लाख राघूचे कमिशन देण्यास दोघेही तयार झाले. आणि त्याला होकार कळवला.

"सरकार, आमची वेळ झाली, आम्ही मघाशी बोलल्याप्रमाणं पर-मुलुखात चाललोय, परत भेट हुईल-न्हाई माहीत न्हाई, म्हनून आमचा मोबदला, तुमचा व्यवहार झाल्यादिवशी आठवणीनं त्या जागेच्या चौकीदाराकडं द्या. आम्हाला पोचता करील त्यो. ” रावबहाद्दूर बोलत होता, ”बरोबर एका आठवडयांनी अरविंद-सरकारांचा माणूस हितंच भेटल तुम्हाला. तंवा जमीन बगा, मोजणी करा आणि लगेचच कागद बी करा. आणि त्येंचे पैशे कसे देणार ते तेंच्याशीच बोलून तुम्ही ठरवा. पण कमी काय पण करू नका, आमचा मोबदला चौकीदाराकडं द्या, चलतो. पण जाता-जाता शेवटचं पण महत्त्वाचं सांगतो; त्या हवेलीत तुम्ही सोताच ऱ्हावा म्हंजे झालं. नमस्कार सरकार, नमस्कार वैनीसरकार, चलतो आम्ही. " असे हात जोडून म्हणत, डोळे बारीक करून हसत-हसत तो निघून गेला.

रात्रीचे अडीच वाजून गेले होते, रावबहाद्दूर जाताच सागरने रूमचा दरवाजा बंद केला, आणि आनंदाने सरिताला टाळी दिली. ज्या गोष्टीची आपण आशा सोडली होती ती किती अनपेक्षितपणे आणि पटकन घडली याचा त्या दोघांनाही खूपच आनंद झाला.

"पण तो रावबहाद्दूर जाताना, त्या हवेलीत तुम्हीच रहा असे का म्हणाला असेल?" - सरिता.

"जाऊदे ना सरिता, तू पण ना त्या पोपटपंचीच्या नाही त्या बोलण्याकडे लक्ष देतेस, पहिल्यांदा आपला व्यवहार पूर्ण करू. झोप आता, निघायचंय ना पहाटे?" – सागर.

झोपायच्या आधी सहजच दोघांचेही लक्ष त्या साईटकडे गेले, तर काही माणसे त्या पुतळ्या जवळ उभे असलेले दिसले.

"बरेच वर्षे तिथे कोणीच नसल्यामुळे लोक नसते उद्योग करत असतील, आपल्या ताब्यात आल्यानंतर सांगू एकेकाला. " असे तो तिला म्हणत, दोघेही झोपले.

"सर, रात्री तुम्हाला भेटायला आलेला तो माणूस कुठे गेला? अजून तो बाहेर गेलाच नाही?" - हॉटेल मॅनेजरने पहाटे पाच वाजता, सागर-सरिता हॉटेल सोडत असताना विचारले.

"काय सांगताय? अहो, तो रात्री अडीच वाजताच गेला आमच्या रूम मधून. " - सागर.

"पण इथे तर आलाच नाही सर?" - मॅनेजर.

"तुमचे लक्ष नसेल किंवा तुम्हाला डुलकी आली असेल, गेला असेल तो पोपटपंची तेंव्हाच. "- असे म्हणून दोघेही तिथून आपल्या घरी निघाले.

ठरल्याप्रमाणे आठवड्यानंतर रत्नमाला पॅलेसच्या त्याच मजल्यावरच्या, त्याच रूममध्ये सागर-सरिताला, अरविंद सरपोतदारांच्या माणसाने त्या प्रॉपर्टीच्या जुन्या आणि नवीन व्यवहाराची कागदपत्रे आणून दिले. जागेची पाहणी, मोजणी दोघांच्याही मनाप्रमाणे पूर्ण झाली. सरिताने खरेदी पत्र वाचून सहीसाठी सरकारी कार्यालयात नेले.

इतक्यात अरविंदला व्हील-चेअरवर घेऊन पत्नी, मेव्हणा आणि वकील आले. सरकारी सोपस्कर पूर्ण करून देवाण घेवाणीचे व्यवहार पूर्ण झाले, आणि ती प्रॉपर्टी हवेलीसहित सागर आणि सरिताच्या नावावर झाली.

*****

तीन-चार महिन्यानंतर, सागरने त्या जागेची पुन्हा एकदा मोजणी करून आपल्याच आर्किटेक्चर कडून शॉपिंग कॉम्प्लेक्सचा जबरदस्त प्लॅन बनवला. जागेची साफ-सफाई करून घेतली. आपल्या एक साईट इंजिनिअरला काही कामगारांसोबत तेथे राहायला पाठवले.

दोन-तीन दिवसानंतर, त्या इंजिनिअरसहित सगळे कामगार 'त्या वास्तूच्या काही खोल्यातून रात्री बोलल्याचे आवाज येतात', म्हणून पळून आले, काही आजारी पडले. त्या हवेलीमध्ये कोणीच राहायला तयार नसल्याचे पाहून सागर-सरितानेच तेथे राहण्याचा निर्णय घेतला. जवळजवळ पंधरा दिवस राहिल्यानंतर सागरने ती हवेली पाडून तेथे प्लॅन प्रमाणे पुढील काम सुरू करायचा निर्णय घेतला.

"सागर, तो रावबहाद्दूर; तुम्ही स्वतः तिथे राहा असे का म्हणाला असेल? कोणाला तरी विचारुयात का एकदा याविषयी?" - सरिताने न-राहवून सागरला विचारले.

"सरिता, वेड्यासारखे काही बोलू नकोस, काय विचार करतेस त्या पोपटपंचीच्या बोलण्यावर. आणि एक सांगू, प्रॉपर्टी सध्या आपली आहे तिचं काय करायचं ते आपण ठरवणार. तो पोपटपंची कोण?" - सागर.

बराच वेळ विचार करत गप्प बसलेली सरिता अचानक बोलून गेली, "ऐक ना सागर, आपण इतके दिवस थांबलोय तर आणखी एक आठवडा थांबूया का?"

"अजिबात नाही, हे बघ सरिता, बराच उशीर झालाय हा प्रोजेक्ट सुरू व्हायला, उद्या माणसे बोलावतोय मी, हवेलीच्या समोरचा पार्किंगचा भाग पडायला. आणि हो, मला तो पुतळा पण माझ्या प्लॅन मध्ये अडचणींचा ठरतोय; तोच उचलणार उद्या सुरुवातीला, समजलं. बघू कोण काय करतंय. " असे म्हणत सागरने आपल्या एका साईट इंजिनिअरला फोनवरून वीस-पंचवीस माणसे आणि तोड-फोडीचे साहित्य घेऊन येण्यास सांगितले, आणि रागारागाने त्या हवेलीतल्या बेडरूममध्ये झोपायला गेला. सरिता पण त्याच्या मागोमाग गेली.

दोघांनाही गाढ झोप लागली होती. इतक्यात,

इतक्यात आपल्या चेहऱ्याच्या अगदी जवळ येऊन आपल्याला कोणीतरी निरखून बघत असल्यासारखे वाटल्यामुळे सागर झोपेतून खडबडून उठला. त्याच्या अंगावर हात टाकून गाढ झोपलेल्या सरिताचा हात हळूच बाजूला सरकवून उठून बसला आणि बाजूला ठेवलेले पाणी प्यायला. काही वेळ तसाच बसून राहिला, एवढ्यात त्याला बाजूच्या खोलीतून कोणीतरी दबक्या आवाजात कुजबुजत असल्यासारखे वाटले. बेडरूमचा दरवाजा

उघडून तो भल्या मोठ्या हॉलमध्ये आला, आणि जुन्या पद्धतीचा काळा लाईटचा खटका खट्टकन खाली करताच झुंबरातले दिवे लावले, आणि पिवळसर लक्ख प्रकाश पडला.

'म्हणतात ना माणूस आपल्या सावलीलाच घाबरतो !' असे मनात विचार करत, भल्यामोट्ठ्या हॉलमधून निघाला, जिथून आवाज आल्यासारखा भास होत होता; त्या समोरच्या रूमकडे. आणि विचार करत असतानाच तो एकदम घाबरला; स्वतःची सावली पाहून नव्हे, तर एवढ्या प्रकाशात सुद्धा स्वतःची न-पडलेली सावली बघून. त्या रूमच्या बंद-दरवाजाजवळ जाऊन, तो मागे वळून आपली सावली शोधू लागला, तर काही क्षणानंतर एक सावली तो आलेल्या मार्गावरून आली आणि त्याला ती परत मिळालेली दिसली. यातून सावरून तो विचार करत इकडे-तिकडे बघत होता, सहजच त्याचे लक्ष खिडकीबाहेर गेले, तर पुतळा त्याच्या जागेवर नव्हताच. घाबरून चेहऱ्यावर आलेला घाम दोन्ही हात वर करून टी-शर्टच्या बाह्यांना पुसत असतानाच त्याने वर केलेला हात धाडकन त्या खोलीच्या दरवाजाला लागला आणि कर्र्र्र्र - - असा आवाज करत तो बंद असणारा दरवाजा उघडला गेला.

उघडलेल्या दरवाजामधून एक-दोन पावले आत जाताच त्याला विचित्र दृश्य दिसले आणि तो आणखीनच घाबरला. त्या खोलीत समोरच असणाऱ्या जुनाट लाकडी सोफ्यावर रावबहाद्दूर एका खानदानी-बाई शेजारी पान खात बसला होता, आणि दिवसा गेटवर काठी घेऊन फिरणारे ते चार-पाच वाचमन हातात भाले घेऊन सेवकासारखे त्यांच्याशेजारी उभे होते.

"ताई-सरकार, हेच ते, या जागेचे नवे यजमान ज्यांना आम्ही बोललो होतो; तुम्ही सोता ऱ्हावा या हवेलीत म्हणून. " – सागरला पाहताच रावबहाद्दूर नेहमीच्या आदबीने त्या बाईला म्हणाला.

"अहो होय, आम्हाला माहिताय, आम्ही स्वतःपण पाहिलंय; आपण त्यांस सांगताना. पण आम्हाला आपण ताई-सरकार का म्हणताय?, नेहमी याद करून द्यावी का, आपण या रत्नमालेचे पती आहात म्हणून? धनी, पहिल्यांदा आमच्या आबांनी आपला घात केला आणि आमच्यापासून हिरावून नेले, आता हे यजमान आमच्यापासून आपणांस हिरावून नेवू पाहतायत, नेहमीप्रमाणे. आम्हाला शांती मिळणार आहे का नाही?, चौकीदार बघताय काय, त्यांनापण अशी अद्दल घडवा की जिंदगीभर मुर्द्यासारखं जगले पाहिजेत. "

त्याला काही समजायच्या आतच आजूबाजूला हातात भाले घेऊन उभे असलेले आडदांड वाचमन जोरात कोलाहल करत सागरकडे पळत येऊ लागले. तो मागे पळायचा प्रयत्न करत होता; इतक्यात दाराच्या चौकटीला त्याचा पाय अडखळून तो खाली पडला. आणि चौकीदार त्याच्या भोवती, त्याच्यावर भाले उगवरून थांबले, रत्नमाला-रावबहाद्दूर त्याच्याजवळ येऊन त्याच्याकडे बघत उभे होते. तो घाबरून त्या दोघांच्याकड़े हात जोडून स्वत:ला सोडण्यासाठी विनंती करू पहात होता. त्यांचे पाय धरण्यासाठी त्यांच्या पायाकडे बघत असतानाच तो एकदम घाबरला; कारण त्यांच्या पायाना पावलेच नव्हती, चौकीदारांना देखील. चालू असलेला कोलाहल एकदम शांत-शांत झाला आणि कानात किर्र्र्र्र् असा आवाज घुमत सागरच्या डोळ्यासमोर अंधारी येऊ लागली.

*****

"अरे दादा, तिथे बस-स्टॅन्ड समोरून उजवीकडे जाणाऱ्या रोडवर अगदी दोन-अडीचशे मीटर जवळच पूर्वेकडे एक चौक लागतो बघ, जिथून वन-वे आहे, त्या दोन्ही वन-वेच्या बरोबर मधोमध एक मोठ्ठा प्लॉट आहे, हॉटेल रत्नमाला पॅलेसच्या समोर, एक जुनाट कौलारू घर पण आहे तिथे. तो प्लॉट घेऊन आपण डेव्हलप केला तर?" त्या शहरातला पहिलाच प्रोजेक्ट पूर्ण करून कालच आपल्या मुंबईच्या ऑफिसात आलेला मंदार आपल्या मोठ्या भावाला केदारला सांगत होता.

"हो रे, मी पण पाहिलीय ती जागा, आपण ती डेव्हलप केली तर त्या शहरातला आपला दुसराच प्रोजेक्ट जम्बो होईल. पण ही बातमी लीक करू नको हां, तिथल्या स्थानिक बिल्डरना मागमूसपण लागू द्यायचा नाही याचा. " - केदार.

"खरंच किती सर्प्राइझिंग होईल नाही सगळ्यांना, हा प्रोजेक्ट सक्सेस झाला तर?" -मंदार.

"झाला तर नाही, करून दाखवायलाच. दोन-तीन दिवसातच जाऊ आपण आणि त्या साईटची चौकशी करू. शुभस्य शीघ्रम. " - केदार.

"शीघ्रम शीघ्रम. " मंदार हसत हसत.

दोन-तीन दिवसांनी दोघेही इथे पोहोचले, त्यांचे नेहमीचं ऑफिस जवळचं हॉटेल सिटी-प्राईड मध्ये अगोदर सांगूनसुद्धा रूम न-मिळाल्यामुळे दोघांची थोडी निराशा झाली, पण त्या साईटसमोर असणाऱ्या ‘रत्नमाला पॅलेस -दि हॉटेल’ मध्ये त्यांना रूम मिळाली. तिथल्या किमती नुसार त्या प्रॉपर्टीची किंमत तीसेक करोड तरी असेल असा अंदाज बांधून, त्याप्रमाणे तयारी करूनच ते दोघेही आले होते. रत्नमाला पॅलेसमध्ये तिसऱ्या मजल्यावर मिळालेल्या रूम मधून ती साईट पूर्णपणे आणि स्पष्टपणे दिसत होती. तिथली इमारत,

झाडी, बगीचा आणि त्या जागेचा आकार बघून दोघेही खूपच खुश होते. दोघांनीही दुसऱ्या दिवशी सकाळपासूनच त्या जागेची चौकशी सुरू केली.

तीन-चार दिवस उलटून गेले तरी हाती काहीच न लागल्याने, दोघेही हताश झाले.

"दादा, त्या जागेच्या वाचमनला आपला मालक माहीत नसावा म्हणजे कमाल आहे नाही. " - मंदार.

"अरे हे वाचमन असेच असतात, यांना मालकाशी काय देणं घेणं. पगार मिळाला की झालं. पण त्या बाजूच्या फुले विकणाऱ्या दुकानदारांना, इस्टेट-एजंटला पण माहीत नसावं याचा कमाल वाटतंय रे. "- केदार.

"आता काय करायचं?, पाच सहा दिवस झालेत आपण मुंबईतली कामं बाजूला ठेवून इथे आलोय. उद्या सकाळी निघूया का परत?" - मंदार.

" होईल होईल काहीतरी मिरॅकल, बी पॉजिटीव्ह, थोडा धीर धर. आता नाही तर पुढच्या वेळी तरी आपलं काम नक्कीच होईल. तू म्हणतोस तसं आपण निघू उद्या सकाळी. मी पहाटे निघण्यासाठी ड्रायव्हरला बोललोय. " - केदार.

खिडकीतून त्या साईटकडे निराशपणे बघत ते दोघेही लवकरच झोपले. नजरेसमोरून ती साईट काही जात नव्हती, पण बऱ्याच वेळानंतर दोघांनाही झोप लागली.

दोघेही झोपेत असतानाच त्यांच्या रूम मधल्या फोनची बेल वाजली,

झोपमोड झाल्यामुळे वैतागून त्याने," हॅलो ! " म्हणताच,

"हॅलो, एक्सट्रीमली सॉरी सर, मी रिसेप्शन मधून बोलतोय. सर आपल्याला भेटायला कोणीतरी रावबहाद्दूर आलेत. " - हॉटेलचा मॅनेजर.

"क्काय, कोण हे रावबहाद्दूर?, काय काम आहे?"- केदार घड्याळाकडे बघत, "आणि किती वाजलेत पाहिलंय का आता? अहो, रात्रीचे साडे अकरा वाजून गेलेत. "

"माफ करा साहेब, तुम्हाला भेटून, तुमच्याशी काहीतरी अति-महत्त्वाचे बोलायचे आहे म्हणत आहेत, मी बरंच समजावून सांगितले तरी ऐकायलाच तयार नाहीत साहेब. " - हॉटेल मॅनेजर.

"द्या त्यांना, मी बोलतो. " - केदार

मॅनेजर कडून फोन घेऊन रावबहाद्दूर, "नमस्कार सरकार, मी रावबहाद्दूर बोलतुय. भेटायचं होतं आपणाला. त्या जागेबाबत, तुम्ही घ्यावी म्हणताय ती जागा. "

त्या चिरक्या आवाजात बोलणाऱ्या माणसाचा राग आला होता, पण जागेचे नाव घेताच दोघेही खुश झाले. दोघेही सोफ्यावर त्या माणसाची वाट बघत बसले.

रात्रीचे बारा वाजले आणि रूमची बेल वाजली.

मंदारने दरवाजा उघडताच, तो माणूस आदबीने कमरेत वाकून दोन्ही हात जोडून "नमस्कार सरकार, माफी असावी, आम्ही रावबहाद्दूर घुले, त्या मालमत्तेचा-गुमास्ता, म्हंजे तुमच्या भाषेत पॉपर्टी-एजंट. " असे म्हणत आत आला. आपले पान खाऊन रंगलेले दात दाखवून हसत, अति अदबीने वागणाऱ्याचा त्या दोघांनाही राग आला होता.

"माजा राग आलाय का सरकार आपणांस?" - तो अचानक बोलून गेला,

दोघांनाही ओशाळल्यासारखे झाले. "बरं कामाचं बोलता का आता?" -मंदार न राहावून म्हणाला.

“तर ऐतिहासिक पार्श्वभूमी असलेली मालमत्ता घ्यायचा तुमचा निर्णय चांगला हाय. " - असे म्हणत रावबहाद्दूर त्याजागेचा इतिहास सांगू लागला. आणि थोडावेळ झाल्यावर आपल्या जवळची काळी बॅग उघडून त्यातून पानाची-चंची बाहेर काढत, खालच्या ओठावर उजव्या हाताचे अंगठ्याजवळचे बोट दाबत म्हणाला, "जरा चोच रंगवू का सरकार?"

तो काय म्हणतोय हे न-कळल्याने प्रश्नार्थक चेहरा केलेल्या त्या दोघांकडे बघत तो पुन्हा म्हणाला, "म्हंजे जरा पान खाऊ का? असं म्हणालो. आमच्या नावात राघू हाय ना म्हणून पान खाण्याला चोच रंगवू का म्हणालो?" असे म्हणत त्यांच्या होकाराची वाट न-बघताच हसत तो रूमच्या गॅलरीत पान खाण्यासाठी गेला.

"बोलका पोपट आहे नुसता, हा काय काम करणार आपलं? धन्य आहे याची अजून इतिहासच संपेना याचा. " - मंदार.

"सरकार, आपण आम्हाला राघू म्हणा नायतर बोलका पोपट म्हणालात तरी चालेल, चला आता कामाचं बोलू. "तो आत येत, आपले लाल-काळे दात दाखवत डोळे बारीक करून हसत म्हणाला. ते पुन्हा ओशाळले.

त्याचा सगळा इतिहास ऐकून जवळ-जवळ छत्तीस हजार स्क्वेअर-फूट असणारी ती जागा गेले पाच वर्षांपासून सागर नावाच्या माणसाची असून, तो अचानक कोमात गेल्याने त्याची पत्नी ऍडवोकेट सरिताने ती जागा विकावयास काढल्याचे आणि त्याचा व्यवहार या बोलक्या पोपटाकडे दिल्याचे त्यांना कळले.

"काय रेट म्हणजे दर आहे आता त्या जमिनीचा ?"- केदार.

"पार्टीला नड असल्यानं बाजारभावापेक्षा कमीच किंमत हाय दर, यात कायबी कमी होणार न्हाय, एकच दाम, तुमच्या भाषेत एकदम फायनल. वीस कोटी; हवेलीतल्या भरल्या सामाना सकट, पटलं तर होय म्हना न्हायतर न्हाई. आणि माझं कमिशन, सरकार तुमच्याकडनं जास्त काय घ्यायचं. तुम्ही खाल्लेल्या भाकरीतला ताटाबाहेर पडलेला एक तुकडा, म्हंजे ठरलेल्या व्यवहाराच्या, हजाराला पाच रुपये. यात पण काय बी कमी नाय सरकार. "

जागेचे वीस करोड आणि बोलक्या पोपटाचे दहा लाख देण्यास तयार झाले आणि त्याला होकार कळवला.

"सरकार, आमची वेळ झाली, आम्ही चाललोय; मघाशी बोलल्या प्रमाणं पर-मुलुखात, परत भेट हुईल-न्हाई माहीत न्हाई, म्हनून आमचा मोबदला, तुमचा व्यवहार झाल्यादिवशी आठवणीनं त्या जागेच्या चौकीदाराकडं द्या. आम्हाला पोचता करील त्यो. ” रावबहाद्दूर बोलत होता, ”बरोबर एका आठवडयांनी वैनी-सरकार हितंच भेटतील तुम्हाला. तंवा जमीन बगा, मोजणी करा आणि लगेचच कागद बी करा. आणि त्येंचे पैशे कसे देणार ते तेंच्याशीच बोलून तुम्ही ठरवा. पण कमी काय पण करू नका, आमचा मोबदला चौकीदाराकडं द्या, चलतो. पण जाता-जाता शेवटचं पण महत्त्वाचं सांगतो; त्या हवेलीत तुम्ही सोताच ऱ्हावा म्हंजे झालं. नमस्कार सरकार, चलतो आम्ही. "

रात्रीचे अडीच वाजून गेले होते, रावबहाद्दूर गेल्यानंतर केदार रूमचा दरवाजा बंद करून आत येताच मंदारने, "येस्स्स्स्स !" असे म्हणत उजव्या हाताची मूठ घट्ट धरून कोपऱ्यातून खाली झटकला, आणि क्रिकेट मधल्यासारखे दोन्ही हात उंचावून केदारला

टाळी दिली. ज्या गोष्टीची आपण आशा सोडली होती ती किती अनपेक्षितपणे आणि पटकन घडली याचा त्या दोघांनाही खूपच आनंद झाला.

"मला एक कळले नाही तो रावबहाद्दूर जाताजाता त्या जागेत तुम्हीच राहा असे का म्हणाला असेल?"- गॅलरीतून त्या साईटकडे पाहात केदार मंदारला म्हणाला.

"तू पण न दादा, त्याचं काही पण ऐकतोस. अरे बोलका पोपटच तो. एकदा प्रॉपर्टी आपली झाली तर कोण ऐकतंय, त्या बोलक्या पोपटाचं. आणि ते बघ इतक्या रात्री त्या प्लॉटवर काही लोक दिसतायत त्या पुतळयाजवळ. एकदा का आपल्या ताब्यात ती जागा आली ना असली सगळी थेरं बंद करू आपण. " - मंदार.

*****

आणि इकडे पुतळयाजवळ सगळे चौकीदार एकत्र होऊन रावबहाद्दूरला एकच सवाल विचारत होते,

"हे यजमान कसे आहेत हो सरकार? ताई-सरकारांच्या मनासारखं घडंल का आतातरी?

का त्येंचीबी हालत आशीच हुईल? आत्तापर्यंत साऱ्या यजमानांची झाली तशी?"

आणि रावबहाद्दूर,

रावबहाद्दूर पुतळा होऊन स्तब्धपणे थांबला होता; वर्षानुवर्षे विचार करत,

'खरंच दोनशे वर्षांपासूनची माझ्या रत्नामालेची इच्छा अबाधित राहील???

कुणाचाही असा बळी न देता - - - - - !!!'

(10/7/2016)

§§§§§§

# सूर महाल : एक आठवण !!!

**ही** घटना, मी कॉलेजला होतो तेंव्हाची आहे. आमचा सात-आठ मुलांचा ग्रुप होता, सगळेच सेकंड-इयरला होतो. फर्स्ट-इयरला हॉस्टेल मध्ये रहात होतो, पण कॉलेजपासून हॉस्टेल बरेच लांब होते. म्हणून वेळ आणि सिटी-बसचा खर्च वाचावायचा विचार करून, हॉस्टेल मध्ये न-राहाता; कॉलेजपासून जवळ, वीसेक मिनिटांच्या अंतरावर असणाऱ्या एका चांगल्या, शांत भागात रूम घेऊन राहू लागलो. आजू-बाजूला असणाऱ्या गल्लीत, सगळेजण जवळ-जवळच रहात होतो. मी, शाम्या, सम्या, अव्या, संत्या, नित्या, विन्या आणि पशा असा आमचा ग्रुप.

एकमेकाला बारशात ठेवलेल्या नावाप्रमाणे बोलवायचे नाही, असा जणू कॉलेज जीवनातला नियमच असतो. आणि ही घटना कॉलेजच्या काळातील असल्यामुळे इथे नावेपण तशीच घेतली आहेत. त्यांची पाळण्यातली म्हणजेच कागदोपत्री नावे काय असतील याचा अंदाज आपण बांधालच !

मी, नित्या एका रूममध्ये रहात होतो, जोशी-आजोबांच्या घरात, त्यांच्याच शेजारीअसणाऱ्या रूममध्ये. आमच्याच गल्लीत उजव्या हाताला दहा-बारा घरे सोडून माडीवर सम्याची रूम, एकटाच राहायचा रूममध्ये, सगळयात हुशार होता ना ! अव्या आणि संत्या एकमेकांचे रूम-पार्टनर, आमच्या गल्ली-समोरच्या तीन गल्ल्या सोडून राहायचे. त्यांच्याच गल्लीच्या बरोबर दुसऱ्या टोकाला एका घराच्यामागे असणाऱ्या एका औट-हाऊस टाईप रूम-मध्ये पश्या आणि विन्या राहायचे. काही अंतरावर असणाऱ्या,

दुसऱ्या एका कॉलनीत शाम्याचं स्वतःचं घर होते, म्हणजेच तो तिथलाच होता, लोकल. आमच्या सगळयांच्यात संत्या आणि अव्या भयंकर डांबरट, म्हणजे धाडशी आणि आगाऊ.

तसा तो भाग शहराच्या मध्यवर्तीच होता, पण शांत आणि बराच मोठा. घरे पण मोट्ठी आणि जुन्या पद्धतीची साठ-सत्तर वर्षांपूर्वीची असतील. घरासमोर आणि आजूबाजूला प्रशस्त जागा, त्या मोकळया जागेवर छोटी-मोठ्ठी फळांची-फुलांची झाडे, आणि मधोमध प्रशस्त असे दोन मजली घर. त्या भागातली घरे थोड्याफार फरकाने जवळजवळ अशीच, प्रशस्त होती. पण त्या भागात एकतर वयस्क म्हणजे जेष्ठ नागरिक रहात असत, ज्यांची मुले-सुना बाहेरगावी नोकरीला आहेत असे. आणि दुसरे एकदम तरुण, कॉलेज-कुमार. त्या वस्तीजवळच दोन-तीन मोठं-मोठे कॉलेज असल्यामुळे आणि स्वतःला सोबत होईल या हेतूने, त्या बुजुर्गांनीच आपल्या घरातल्या काही खोल्या विद्यार्थ्यांना भाड्याने दिल्या होत्या. जशा आम्हाला दिल्या होत्या तशा.

आम्ही रहात असलेल्या घरासमोरून डावीकडे जाणाऱ्या रस्त्यावरून सरळ गेल्यानंतर, गल्लीच्या शेवटी उजव्या हाताला एक मोठी जागा होती. सगळया प्लॉटपेक्षा जवळ-जवळ चार-पटीने मोठ्ठा. चोहोबाजूने तारेच्या कुंपणाच्याकडेने आंब्याची, जांभळाची, अशोकाची अशी अनेक झाडे. मधोमध एक बंगला, चार मजली पितळी अक्षरांनी‘सु--र महाल’ असे नाव लिहिलेला.

त्या गल्लीतली सर्व घरांपेक्षा थोडा नवीन वाटत होता, जुनं घर पाडून नवीन बांधल्यासारखा, तरीपण वीस-पंचवीस वर्षांपूर्वीचा. समोर एक भलेमोट्ठे गेट, त्या गेटपासून घराच्या पार्किंगपर्यंत चारचाकी गाडी जाण्यासारखा नागमोडी रस्ता. दुसऱ्या एका बाजूला छोटेसे गेट, माणूस जाईल असे. त्या गेटपासून घराच्या जिन्यापर्यंत जाण्यासाठी पण एक नागमोडी रास्ता, तिथल्या वाळलेल्या लॉन-मधून जात होता. पार्किंग पासून जिन्यापर्यंत जाणारा रस्तासुद्धा त्या छोट्याशा रस्त्याला मिळत होता. आणि दोन छोटे रस्ते जेथे मिळत

होता त्या कोपऱ्यात एक दोन-अडीच फुटी संगमरवरी मूर्ती. नाचणाऱ्या पोजमधे, एका हातात फुले आणि दुसऱ्या हातात कलश घेतलेल्या बाईची.

त्यावरून, ज्यांनी कुणी हा बंगला बांधला होता त्यांची जबरदस्त कल्पनाशक्ती, हौस आणि त्यांची श्रीमंती दिसून येत होती. असे भलेमोठे, पण कुणीच रहात नसलेले चार-मजली घर, त्याच्या समोरून मेसला जेवायला जाताना आम्ही रोजच बघत होतो. या भागातले जवळपास सगळेच लोक त्या घरासमोरून जात असताना इकडे-तिकडे न-बघता आपले बोलणे बंद करून भरकन निघून जात, जणू पळल्यासारखेच ! आणि घराचा आवार संपला कि पुन्हा नॉर्मल. आम्हा सर्वांना मात्र त्या लोकांच्या अशा वागण्याचे फार मजेशीर वाटे. कुतूहलापोटी आम्ही त्यांना त्याविषयी विचारले, तर कुणीच काहीच बोलत नसत.

एक दिवस, मी आणि नित्याने आमच्या घर-मालकांना म्हणजे जोशी-आजीआजोबांना या विषयी विचारले,

तर कधीही न-चिडणारे आजोबा एकदम रागाने ओरडून म्हणाले," तुम्ही शिकायला आलात ना इथे ? मग नसत्या चौकशा न-करता शिकण्याकडे लक्ष द्या, फक्त अभ्यास करा, नको त्या गोष्टींमध्ये लक्ष घालू नका, वेळपण घालवू नका. समजलं? आणि पुन्हा हा विषय या घरातच नाही तर या आवारात अजिबात काढायचा नाही. " आजोबांचा जमदग्नी अवतार बघून आम्ही दोघेही चूप-चाप खाली मान घालून आमच्या रूममध्ये परत आलो.

रोज सकाळी साडेसहा-सात वाजता हातात परडी घेऊन, मंत्र म्हणत आमच्या आवारातल्या झाडावरून जास्वदीं, गुलाब, सदाफुली, मोगरी अशी बरीच फुले, आणि तुळशीच्या मंजिऱ्या गोळा करणारे आजोबा खूपच प्रेमळ होते. फुले तोडता-तोडता आमच्या रुमसमोर येऊन," नितीन, मिलिंद, अरे सकाळ झाली उठा, कॉलेज आहे ना आज? सात

वाजत आले उठा पोरांनो, आवरून जा कॉलेजला. " असे म्हणत हलकेच दार वाजवून आम्हाला उठवायचे, आणि नेहमी प्रेमानेच बोलायचे. असे प्रेमाने वागणारे आजोबा आज एकदम भडकलेले बघून आम्ही खूपच घाबरलो, आणि शांतपणे रूममध्ये येऊन बसलो, एकमेकांशी न-बोलता. पण त्यांच्या रागावण्याने, आमच्या घाबरलेल्या मनात त्या दिवशी कुतूहलाने जागा घेतली,

त्या बंगल्यातल्या रहस्याच्या कुतूहलाने !!!

सकाळी नेहमीप्रमाणे आजोबांची हाक ऐकू येताच दोघांनाही जाग आली. आणि,

"हो आजोबा उठलोय, आवरतो. " असे म्हणत उठलो. एकमेकांशी काहीही न-बोलता तासाभरात आवरून कॉलेजला निघालो. जाताजाता सगळे सोबती भेटले. आम्ही दोघेही काहीच बोलत नसलेले बघून अव्या," काय दोघेही बोलेना झालाय? काय भुतानं झपाटलाय कि काय रे?" असे म्हणताच आम्ही पटकन एकमेकांकडे बघितलो.

न-राहावून रात्री त्या घराविषयी विचारल्यावर, आजोबा रागावल्याचा प्रसंग सगळयांच्या समोर सांगितला.

"म्हातारा एवढा भडकला म्हणजे नक्कीच काहीतरी भानगड असणार त्या बंगल्याची, आज रात्रीच जाऊन बघूया. " संत्या.

एवढ्यात, "नको संत्या, आम्ही सुद्धा काल शेजारच्या लॉंड्रीवाल्याला असाच प्रश्न विचारला, तर तो सुद्धा भडकला होता, म्हणजेच नक्कीच काहीतरी लोच्या आहे. " पशा आणि विन्या बोलले. "मग आज नक्की मोहीम फत्ते करायचीच, त्या बंगल्याची माहिती काढायचीच. " अव्या.

सकाळी उशिरा कॉलेजला आलेला शाम्या दुपारी प्रॅक्टिकल संपवून आमच्यासोबत आला. त्या बंगल्यातल्या मोहिमेविषयी त्याला अव्याने सांगताच तो घाबरला आणि म्हणाला, "नसत्या भानगडीत पडू नका. मी लहानपणापासून ऐकतोय त्या बंगल्यात रात्री अकरानंतर एक बाई फिरते म्हणे, सगळयात वरच्या मजल्यावरून खाली उतरते, बंगल्यात फिरून परत वरच्या मजल्यावर गायब होते म्हणे. "

"मग तर बघायचच नक्की कोण आहे ती बाई. " संत्या.

"अरे मी हे पण ऐकलंय, बाई गाणं म्हटल्यासारखे आवाज पण येतात म्हणे कधी-कधी त्या बंगल्यातून. म्हणूनच त्या बंगल्यावर 'सूर महाल' असे नाव लिहिलंय म्हणे. " शाम्या.

आतामात्र आमची जाम टरकली म्हणजे कॉलेजच्या भाषेत सगळयांचा काटा किर्रर्रर्र झाला. सगळेजण आमच्या रूमच्या गेटसमोरून त्या घराकडेच पाहू लागलो.

"शाम्या, भित्र्या तू स्वतः कधी पाहीलंयस का त्या बाईला, का तिच्या गाण्याच्या मैफिलीला गेला होतास? नुसता म्हणे-म्हणे म्हणून सांगतोयस. " म्हणत हसत अव्या पुढे म्हणाला, "भूत-बीत काही नसतं, उगाचच आमच्या ह्या जवानांना भीती घालू नकोस. आम्ही आज रात्री जाणारच त्या बंगल्यावर, आणि तू पण यायचं, कळलं. " नाही-नाही म्हणणाऱ्या शाम्याला कसाबसा तयार केला, आणि उद्या कॉलेजला सुटी असल्याने आजच रात्री, जेवल्यानंतर तिथे जायचे सगळयांचे ठरले.

जेवून परत येताच, सम्या न-सांगता हळूच सटकला, शाम्या घरातून आलाच नाही, पशा डोके दुखत असल्याचे नाटक करत येणार नसल्याचे विन्या म्हणाला. मग शेवटी अव्या, संत्या, विन्या, नित्या आणि उसने धाडस मनात आणलेला मी मोहिमेवर निघालो.

रात्रीचे साडे-दहा वाजत आले होते, रस्त्यावर चिट-पाखरूही नव्हते. रस्त्यावरची शांतता अगदी स्मशान-शांतता भासत होती. आम्ही पाचही जण त्या बंगल्याकडे निघालो. बंगल्याच्या छोटयाशा गेटपाशी पोहोचलो. संत्या-अव्या गेटवरून उडी मारून आत गेले, नित्या, विन्या आणि मी त्यांच्या मागोमाग गेलो. मनात भरलेली भीती कमी वाटण्यासाठी मनातल्या मनात 'भीमरूपी महारुद्रा वज्र हनुमान मारुती' जसे जमेल तसे म्हणू लागलो. अव्या त्या संगमरवरी मूर्तीजवळ जाऊन ती उचलण्याचा प्रयत्न करू लागला, पण ती हललीच नाही. बराच प्रयत्न करून सुद्धा ती हालत नव्हती. म्हणून आम्ही पार्किंगकडे गेलो, आतमध्ये चार-पाच कार होत्या, एक इंपोर्टेड कार, दोन अँबॅसिडर, एक प्रीमियर पद्मिनी आणि एक जीप. उंदीर-पाली-झुरळ आणि जळमटांनी भरलेले मोठ्ठेच्या मोठ्ठे पार्किंग पूर्ण फिरून बघत होतो.

बॅटरीच्या प्रकाशात काहीतरी चमकले म्हणून पहिले तर तिथे 'भेदा' अशी लिहिलेली पितळी अक्षरे पडलेली दिसली. आम्हाला त्या अक्षरांचा अर्थच कळला नाही, मात्र भीती जरूर वाटली.

तिथून वरच्या म्हणजे पहिल्या मजल्यावर जाणाऱ्या दरवाजापाशी गेलो, आणि बघतो तर दरवाजा बंद होता. आतून कडी लावलेला. जोरात पण आवाज न-करता ढकलून उघडायचा आम्ही प्रयत्न करत होतो, एवढ्यात मला तिसऱ्या मजल्यावर लाईट लागलेला दिसला, आणि मी सर्वांना तसे बोललो. आम्ही खालूनच त्या लाईटकडे पाहू लागलो तर तो लाईट जिन्यावरून दुसऱ्या मजल्यावर आला, आणि पहिल्या मजल्याकडे येऊ लागला. आम्ही सर्वजण आवाज न-करता, गेटवरून उड्या मारून शक्य तितक्या जोरात पळत त्या बंगल्याच्या आवाराबाहेर आलो. त्याच वेगात आमच्या मेसकडे पळून गेलो. मेससमोर असलेली चहाची टपरी उघडीच होती. तिथे पिपातल्या पाण्याने तोंड धुवून सगळेजण चहा पिऊ लागलो.

त्या टपरीसमोरून त्या बंगल्याचा दुसरा आणि तिसरा मजला वाऱ्याने हलणाऱ्या झाडाशी लपंडाव खेळल्यासारखा स्पष्टपणे दिसत होता, कधी दाट अंधारलेला, तर कधी स्ट्रीटलाईटच्या प्रकाशात अंधुकसा.

चहा पिता-पिता संत्याकडे लक्ष गेले, तर त्याच्या हातात एका कारच्या खिडकीची काच होती. सगळे त्याच्याकडे पाहताच तो म्हणाला, "अरे जी-टी करायला म्हणून घेतलीय, तिथल्याच एका कारची काच निघाली होती, ती घेऊन आलोय. " जी-टी म्हणजे ग्लास ट्रेसिंग इंजिनीरिंग मध्ये नामांकित प्रकार, एखाद्याने काढलेले ड्रॉईंग घेऊन त्याच्यावर कोरा पेपर लावून त्या काचेवर ठेवायचा आणि त्या काचेखाली बल्ब लावायचा आणि ट्रेसिंग करायचे. पण अशा घाबरलेल्या स्थितीतही संत्याचे धाडस बघून अचाट वाटले.

बोलता-बोलता सगळ्यांचे लक्ष त्या बंगल्याकडे गेले, तर पुन्हा एक लाईट पहिल्या मजल्यावरून जिन्याने दुसऱ्या आणि दुसऱ्या मजल्यावरून तिसऱ्या मजल्यावर आलेला त्या बंगल्याच्या काचेतून दिसू लागला. स्तब्ध होऊन सगळेजण बघत होतो. काहीवेळ तो लाईट तिसऱ्या मजल्यावर पूर्णपणे फिरला आणि खाली येऊ लागला. आमची छाती धडधडू लागली, सगळ्यांनाच घाम फुटला.

त्यात सुद्धा तो फिरणारा लाईट नक्की काय प्रकार आहे हे बघण्यासाठी परत त्या बंगल्यात जाऊ असे धाडशी अव्या आणि संत्या म्हणत होते पण आम्ही त्याला विरोध केला. कारण रात्रीचे बारा वाजत आले होते. चहाच्या टपरीवरून आमच्या रूमकडे जाणारा जवळचा रस्ता त्या बंगल्यासमोरूनच जात होता, पण आमचे धाडस न-झाल्याने आम्ही सगळेजण लांबच्या रस्त्याने आपापल्या रूमला गेलो. रात्री झोपेत सुद्धा तो बंगला, तो फिरणारा लाईट, तो उंदरा-पालींनी भरलेला पार्किंग, त्या कार जश्याच्या तश्या दिसत होत्या. 'भेदा' लिहिलेली अक्षरे, त्यांचा अर्थ काय असेल असा विचार करत असताना, कधी झोप लागली कळलेच नाही.

कुणीतरी रूमचा दरवाजा वाजवल्यामुळे अचानक जाग आली. बघतो तर सकाळचे सहाच वाजले होते. आज सुटी असल्याने आजोबा नक्कीच नसणार, आणि असते तरी ते एवढ्या जोरात दार वाजवणार नाहीत. 'एवढ्या सकाळी सकाळी कोण असणार?' असा विचार करत होतो इतक्यात नित्याने दरवाजा उघडला, बघतो तर संत्या आणि अव्या !

त्यांना बघताच, "एवढ्या सकाळी का कडमडलात रे, सुटीच्या दिवशी?" आश्चर्याने नित्या म्हणाला.

" रात्री तो फिरणारा लाईट, काय भानगड आहे बघायला पहाटे पाच वाजताच आम्ही गेलो होतो त्या बंगल्यात, म्हणजे सूर महालात. " अव्या.

"क्काय, अरे तुम्हाला काही कळतंय का नाही, रात्री एवढी फाटली होती सगळ्यांची तर का नसतं धाडस करताय?" मी आणि नित्या घाबरून.

बाजूला ठेवलेल्या तांब्यातले पाणी पिऊन संत्या म्हणाला," अरे नीट एक तरी, रात्री फिरणारे ते भूत-बीत काही नव्हतं, तो त्या बंगल्याचा वाचमन होता, कंदील हातात घेऊन वर-खाली फिरत होता. "

"आणि झोपला होता सकाळी त्या बाकावर. त्याच्याशी गप्पा मारून आलो तासभर. " अव्या.

आता कुठे छातीतली धडधड कमी होत होती.

"त्या गेटच्या आत जाऊन ती मूर्ती पण बघून आलो, त्याची गम्मत काय आहे माहिताय? अरे त्या मूर्तीच्या हातातल्या कलशातून पाणी पडत होतं म्हणे पूर्वी. त्याला खालून पाण्याचे कनेक्शन असल्यामुळे ती मूर्ती हलत नव्हती. " हसत हसत संत्या म्हणाला.

"त्या बंगल्याच्या दरवाजाला कुलूप होतं, त्याची चावी वाचमनकडे असणार पण नाही म्हणाला. थापा मारत असणार तो वाच्या. " अव्या.

त्या दोघांचे धाडस बघून दोघेही आ वासून त्यांच्याकडे बघत होतो.

“आठ दहा दिवसांनी तो वाच्या दोन दिवसासाठी गावाला जाणाराय, तेव्हा सगळ्यांनी बंगल्यात घुसायचं. " संत्या.

"बंगला फिरून बघायचा आणि ती मूर्ती पण पळवायची. मी मूर्ती काढण्यासाठी लागणारी हत्यारे आणून ठेवतो. " अव्या. अव्याला ती मूर्ती कशाला पाहिजे होती काय माहित.

त्या बंगल्यासमोरून चहा प्यायला जाताना तो वाचमन दिसला. अंगावर मळकी शाल पांघरलेला, पांढरी दाढी-मिशा असणारा रामसेच्या भयपटात शोभेल असा वाचमन बघून भीती वाटली खरी, पण अव्या-संत्या त्याच्याशी बोलून आल्याचे बघून त्यांचे कौतुक वाटले.

दहा-बारा दिवसानंतर आम्ही सगळेजण रात्री मेसमध्ये जेवत असताना, अव्या आणि संत्याने पहाटे सगळ्यांनी मिळून पुन्हा त्या बंगल्यावर जाण्याचे प्लॅनिंग केले. आणि आमच्या छातीत धडधड वाढली. सम्या आणि पश्याने नकार कळवला. पुन्हा आम्ही पाचहीजण तयार झालो पहाटे चार-साडेचार वाजता, तो बंगला बघायला जाण्यासाठी !

जेवून परत रूमवर येत असताना त्या बंगल्यात फिरणारा लाईट आम्हाला दिसलाच नाही, म्हणजे तो वाचमन आपल्या गावी गेला असावा. पहाटे लवकर उठायचे असल्याने लवकरच झोपलो.

नित्याच्या कण्हण्याच्या आवाजाने मला जाग आली. बघतो तर नित्या दोन-तीन चादरी घेऊन झोपला होता. मी उठून लाईट लावला तर नित्या खिडकीकडे हात करत होता म्हणून मी खिडकीकडे जाऊ लागलो तर तो तिकडे न-जाण्यासाठी हात करत होता. त्याला थंडी वाजत असल्याने तो मला नको म्हणत असेल, असे वाटून मी लाईट बंद करून पुन्हा झोपून राहिलो. काही वेळातच त्याला गाढ झोप लागली, आणि मला कुणीतरी खिडकी वाजवल्यासारखे वाटले. मी हळूच उठून खिडकी उघडली, आणि इकडे तिकडे बघू लागलो.

अचानक मी प्रचंड घाबरलो आणि अंगावर सर्र्र्र्रकन काटा आला. कारण माझ्या समोरच त्या खिडकीतून आतमध्ये बघत एक बाई उभी होती. अंधारासारखीच काळी साडी नेसलेली, केस मोकळे सोडलेली, त्या अंधारातसुद्धा जाणवण्याइतकी दिसायला गोरी, कपाळावर भलेमोट्ठे काळे कुंकू लावलेली, आणि पांढरे-शुभ्र डोळे, काळे बुबुळच नव्हते. मी थरथरत्या हाताने खिडकीचे दार बंद करून घेतले, आणि जाऊन झोपलो. डोळयासमोरचे दृश्य हलतच नव्हते, इतक्यात झोप लागली.

पाचही जण त्या बंगल्याचे गेट पार करून आत गेलो, हातातली हत्यारे अव्याने त्या पुतळयाशेजारी ठेवली. बंगल्याचे दरवाजे उघडेच होते दिसले म्हणून पहिल्यांदा आम्ही त्या बंगल्यात घुसलो. पहिल्या मजल्यावर आलो, प्रशस्त हॉल, श्रीमंती नजरेत भरण्यासारखा सजवलेला होता. बघत बघत दुसऱ्या मजल्यावर गेलो, तिथेपण एक हॉल, दोन बेडरूम होत्या. तिसऱ्या मजल्यावर पुन्हा मोठा हॉल; सोफा, भलामोठा टीव्ही होता. आम्ही इकडे तिकडे बघत होतो एवढ्यात ‘कर्र्र्र्र्र्र खस्सस्स्स’ आवाज करत अचानक तो ब्लॅक अँड व्हाईट टीव्ही चालू झाला, आणि भल्या मोठ्या टीव्ही-मधल्या त्या मुंग्या बघून

आम्ही घाबरलो. शेजारच्च्याच बेडरूम मधून एक बाई टीव्ही कडे बघत बाहेर आली, तीच जी मला रूमच्या खिडकीत दिसली होती ती.

ती आमच्याकडे बघून तोंडातून विचित्र आवाज काढत हातवारे करू लागली. तिच्या हावभावावरून मुकी वाटत होती. आणि अचानक तिने जवळच असणाऱ्या काही अक्षरातून 'भेदा' अशी अक्षरे उचलली. ती नक्की कोणाकडे बघतेय हे न-कळल्यामुळे आम्ही मागे वळून बघू लागलो तर, आमच्या मागे त्या दारात तिच्यासारखाच दिसणारा एक माणूस उभा होता, आमच्याचकडे बघत. आम्ही पाचही जण पळून जाण्यासाठी मागे वळलो,

तर त्याने, "शस्त्र घेऊन येतो. " असे म्हणत दरवाजा धाडकन बंद करून घेतला. आम्ही दरवाजा जोरजोरात धड्कावू लागलो, कानात फक्त त्या दरवाज्याचा आवाजच घुमत होता,धाड – धाड - धाड – धाड !!!

धाड – धाड - धाड – धाड असा दरवाज्याचा आवाज ऐकू येताच झोपेतून जागा झालो, आणि लक्षात आले; ते स्वप्न होते, तो भास होता. पण उठवतच नव्हते, डोके जड झाले होते, अंग गरम झाले होते. कसाबसा उठून दरवाजा उघडला तर समोर घरमालक-आजोबा आणि शाम्या थांबले होते, आणि सकाळचे नऊ वाजून गेले होते.

"साडे-सहा वाजल्यापासून मी उठवतोय तर उठलेच नाहीत मला वाटले कॉलेजला सुटी असेल, बरे झाले तू आलास. " असे शाम्याकडे बघत आजोबा म्हणाले.

“हे कोणीच कॉलेजला आले नाहीत म्हणून मी यांना भेटायला आलोय. " शाम्या.

आम्ही दोघेही तापाने आजारी असल्याचे आजोबांना कळले. आणि ते नित्याजवळ आणि शाम्या माझ्याजवळ बसून आमच्या कपाळावर थंड पाण्याच्या पट्ट्या

ठेवू लागले. काही वेळानी आजींनी चहा-बिस्किटे आणून दिली. आजोबांच्या सल्ल्यानुसार शाम्या आम्हा दोघांनाही शेजारच्याच गल्लीतल्या आपटे डॉक्टरांच्याकडे घेऊन गेला.

मी आणि नित्या शाम्यासोबत डॉक्टर बोलावण्याची वाट बघत क्लीनिक मध्ये बसलो होतो. इतक्यात पश्या तापाने फणफणलेल्या विन्याला घेऊन आला. डॉक्टरांनी आम्हाला आत बोलावले, आम्ही तिघेही आत चाललो होतो, तर संत्या आणि अव्या डॉक्टरच्या केबिन मधून बाहेर आले; सम्यासोबत. आमच्यानंतर विन्या पश्यासोबत आत गेला. आम्ही सगळेजण बाहेरच बसलो होतो, काही वेळातच विन्या बाहेर आला, पश्या डॉक्टरांजवळच होता, त्याने शाम्याला आत बोलावले. काही वेळानंतर आपापल्या रूममध्ये जाऊन झोपलो.

तापातून बरे झाल्यावर चार-पाच दिवसांनी शाम्याने आम्हा पाचही जणांना आपल्या घरी बोलावले. आम्ही त्याच्या घरी जाताच, नगरपालिकेत नोकरी करणारे शाम्याचे वडील आमच्याशी गप्पा मारत बसले.

बोलता-बोलता ते म्हणाले, "चारपाच दिवसापूर्वी तुम्ही सगळेजण आजारी असल्याचे शामा बोलला मला. डॉक्टरांनी त्याला बोलावून तुम्ही घाबरून आजारी पडलात असे म्हणाले. मी शामशी तेंव्हाच बोललो होता आता तुमच्याशी पण स्पष्टच बोलतो अजिबात घाबरू नका. तुम्ही ज्या बंगल्यात गेला होतात ना, तो आफळीचे सरकार सुभेदारांचा आहे. ही माहिती मी आमच्या ऑफिसातून काढली आहे. तर त्या बंगल्याचे नाव सुद्धा 'सुभेदार महाल' ठेवले आहे, आता त्यातली काही अक्षरे पडून गेलीत. पंचवीस-तीस वर्षांपूर्वी धनाजी सुभेदारांनी तो बंगला बांधला, आपली शेती विकून. चैनीखोर धनाजीने आपल्या बहिणीला फसवून तिच्या वाटणीची जमीन पण विकली, आणि इथे भलीमोट्ठी जागा घेऊन हा बंगला बांधला. नंतर त्याची बहीण इथेच येऊन राहिली आपल्या पतीसोबत. काही दिवसांनी ती सगळयात वरच्या मजल्यावर मरून पडलेली दिसली. तिने

आत्महत्त्या केली कि तिचा खून झाला कळलेच नाही. त्या बंगल्याचा ताबा कुणाचा यावर कोर्टात केस चालली आहे गेल्या पंधरा वर्षांपासून. त्यामुळे तिथे कुणीही जात नाही, आणि म्हणून लोकांनी ही अफवा पसरवली आहे, म्हणून तुम्ही पण तिथे जाऊ नका, समजलं !"

शांतपणाने आणि मोकळया मनाने आम्ही तिथून आमच्या रूमवर आलो, संत्याने तिथून आणलेली त्या कारची काच पुन्हा तिथे नेवून ठेवली. त्या दिवसापासून आम्ही त्या बंगल्यासमोरच्या रस्त्यावरून कधीही फिरलो नाही, आमचे फायनल इयर संपले तरी.

आज वीस-बावीस वर्षे झाली त्या घटनेला, आम्ही मित्र जेंव्हा-जेंव्हा एकमेकांशी फोनवर बोलत असतो, तेंव्हा त्या प्रसंगाची चर्चाही होतेच आणि त्यावेळी झालेल्या आमच्या स्थितीचे हसूही येते.

खरंच,

त्या रात्री तो भास होता हे खरे, पण आमच्या सगळयांच्या खिडकीत दिसलेली ती बाई कोण होती आणि ते पडलेले स्वप्न; आम्हा पाचही जणांना एकाच रात्री कसे काय पडले?

हा प्रश्न जेंव्हा मनात येतो तेंव्हा अजूनही,

डोक्यातला काटा किर्र्र्र्र्र्र्र होतो !!!

(15/08/2016)

§§§§§§

# ई साहित्य प्रतिष्ठान

ई साहित्य प्रतिष्ठान मराठी साक्षरांमध्ये वाचनाची आवड निर्माण व्हावी आणि लेखक व कवींना एक सशक्त व्यासपीठ मिळावे या दुहेरी हेतूने स्थापन झाले. मराठीत एक जबरदस्त वाचन संस्कृती निर्माण व्हावी, तरुणांनी भरपूर वाचन करावे, ग्रामीण भागातील तरुणांना मोबाईलवर पुस्तके उपलब्ध व्हावीत, परदेशस्थ मराठी वाचकांना सहजासहजी इंटरनेटवर पुस्तके मिळावीत हे आमचे स्वप्न. जगातील चाळीस देशांतील सुमारे साडॆतीन लाख वाचक या चळवळीचे सभासद आहेत. त्याशिवाय वर्षाला सुमारे तीस ते चाळीसलाख वाचकवेबसाईटवरून पुस्तके डाऊनलोड करतात.

अर्थात याने आमचं समाधान नाही. सुमारे बाराकोटी मराठी माण्सांपैकी किमान अर्धे “ .माउलिंनी सांगितलंय .च्छा आहेव्हावेत अशी आमची इ ”वाचक“म्हणजे सहा कोटी लोक जो जे वांछिल ते तो लाहो”. आमचीही वांछा पूर्ण करील ”तो“. करीलच.

आमच्या वाचकांना एकच विनंती. आपल्या ओळखीच्या किमान दहा साक्षरांचे ई मेल पत्ते आम्हाला पाठवा. अशा रितीने आपण तीनाचे तीस आणि तिसाचे तिनशे होऊ. या मराठीचिये नगरी ब्रह्मविद्येचा सुकाळू व्हायला वेळ नाही लागणार. सर्वांची साथ असेल तर.

एवढी विनंती मान्य कराच.

ई मेल पत्ते esahity@gmail. com या पत्त्यावर पाठवा बरं!